सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि.१८ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### नागपुरात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेच्या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून शनिवारी, १८ एप्रिल २०२६ रोजी नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळा आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जारी केले आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार जिल्ह्यात 'हीट वेव्ह'ची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

### हार्बर रेल्वेच्या होणार गारेगार प्रवास

**तभा वृत्तसेवा**

नवी मुंबई : उन्हाच्या तडाख्यामुळे त्रस्त झालेल्या रेल्वे प्रवाशांचा हार्बरवरील प्रवास आता अधिक गारेगार होणार आहे. ताफ्यात दाखल झालेली नवी वातानुकूलित (एसी) लोकल छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-पनवेल वाशी मार्गावर चालवण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. यामुळे हार्बरवरील एसी लोकल फेऱ्यांची संख्या दुप्पट होणार आहे. मध्य रेल्वेवरील उपनगरी एसी फेऱ्यांची संख्या १००पार होणार आहे.

## मुंबईच्या खेळाडूंना मिळणार पगार

मुंबई : मुंबई क्रिकेट संघटनेने आघाडीच्या खेळाडूंना प्रत्येक रक्कम मोसमासाठी ठराविक देण्यासाठी पाऊल उचलले आहे. भारतीय क्रिकेट बोर्डाच्या करारपद्धतीच्या धर्तीवर ही यंत्रणा असेल. आयपीएलसाठी करारबद्ध न झालेल्या खेळाडूंना याचा फायदा होईल. या करारामुळे खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळण्यास मोलाची मदत होईल, असा विश्र्वास मुंबई रणजी संघातील आघाडीचा खेळाडू शम्स मुलानीने व्यक्त केला.

# फक्त देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न; राहुल गांधी

नवी दिल्ली : केंद्र सरकारनं आणलेल्या महिला आरक्षण आणि मतदारसंघ फेररचनेशी संबंधित घटना दुरुस्तीच्या तीन महत्त्वाच्या विधेयकांवर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाची भूमिका मांडली. सरकारनं आणलेलं महिला आरक्षण विधेयक महिलांना सशक्त करण्यासाठी नाहीए. हा शेमफूल कायदा आहे. जुना कायदा आणा. आम्ही लगेच समर्थन देतो, असं राहुल गांधी म्हणाले. भारताच्या निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरु असल्याचा आरोप गांधी यांनी केला.

'भारतीय इतिहासातील हे सर्वात कटू सत्य आहे. मला याबद्दल सगळी माहिती आहे. हे विधेयक ओबीसी, दलितांसाठी अतिशय क्रूर आहे. ओबीसी, दलित आणि महिलांसोबत काय होतं, याची सगळ्यांना कल्पना आहे. ओबीसी वर्गात येणाऱ्या बंधू, भगिनींचा अधिकार काढून घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. संविधानापेक्षा मनुवादाला अधिक महत्त्व देण्याचा प्रयत्न सुरु आहे. अमित शहा म्हणतात, जातीय जनगणना सुरु झाली आहे. मग म्हणतात, घरांना जात नसते. यानं काहीही फरक पडत नाही,' अशा शब्दांत राहुल गांधी सत्ताधाऱ्यांवर बरसले.



'देशातील राजकीय वातावरण पाहून तुम्ही घाबरता. तुमची शक्ती कमी होत चालली आहे. त्यामुळेच तुम्हाला निवडणूक नकाशा बदलायचा आहे. हेच तुम्ही आसाममध्ये केलं. पण आम्ही तुम्हाला निवडणूक नकाशा बदलू देणार नाही. संपूर्ण विरोधी पक्ष या विरोधात उभा राहील आणि तुमचा पराभव घडवेल. आम्ही तुम्हाला ओबीसींचा अधिकार हिसकावू देणार नाही. तुम्ही त्यांना हिंदू म्हणवता. पण देशात त्यांना त्यांचा अधिकार देत नाही. तुम्हाला सत्य आवडत नाही,' अशी घणाघाती टीका राहुल गांधींनी सरकारवर केली.

'हे महिला आरक्षण विधेयक नाहीए. हे विधेयक महिलांना सशक्त करणार नाही. हा केवळ भारताचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. हा शेमफूल कायदा आहे. संपूर्ण विरोधी पक्ष एकच गोष्ट तुम्हाला सांगतोय, जुना कायदा आणा. आम्ही लगेच पाठिंबा देतो. पण या विधेयकाला पाठिंबा देणार नाही. हेच सत्य आहे आणि मी तेच तुम्हाला सांगतोय. भारताच्या इतिहासातील हे कटू सत्य आहे. मी याबद्दल सगळं जाणतो. ओबीसी, दलितांसाठी हे अतिशय क्रूर विधेयक आहे,' असं राहुल गांधी म्हणाले.

## यादगिरीमध्ये कार आणि बसची समोरासमोर धडक; अपघातात ६ जणांचा होरपळून मृत्यू

**वृत्तसंस्था**

**यादगिरी :** खासगी बस आणि कारची समोरासमोर धडक झाल्याने अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. कर्नाटकच्या यादगिरी जिल्ह्यात शुक्रवारी ही घटना घडली. धडक बसल्यानंतर कारने पेट घेतला. या आगीत कारमधील सहा जण होरपळले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, अग्नीशमन दल आणि आपत्कालीन पथकांनी घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले.

फ्री प्रेस जर्नलने दिलेल्या वृत्तानुसार, कार यादगिरीहून रायचूरच्या दिशेने जात होती, तर बस बंगळुरूवरून कलबुर्गीकडे चालली होती. अतिवेग आणि निष्काळजीपणामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. अपघातात कारमधील सर्वांचा मृत्यू झाला तर बसमधील काही प्रवाशांना किरकोळ जखम झाली. अपघातात बसच्या पुढच्या भागाचे नुकसान झाले आहे.

अपघातानंतर परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. आपत्कालीन पथकांनी परिस्थिती नियंत्रणात आणून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला. अपघात नेमका कशामुळे झाला

# खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळकेंचा अपघाती मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर : स्वतःला 'कॅप्टन' तसेच राजकीय ज्योतिषी म्हणवून घेणारा भोंदू आणि महिला अत्याचार प्रकरणातील प्रमुख संशयित अशोक खरात याच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचे अपघाती निधन झाल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात शेळकेंना प्राण गमवावे लागले.



अपघातात यांचा जागीच मृत्यू झाला, तर पत्नी आणि मुलगा गंभीर जखमी आहेत. जितेंद्र शेळके हे अशोक खरातचे निकटवर्तीय मानले जात.

समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. छत्रपती संभाजीनगर येथून शिर्डीकडे जात असताना धोत्रे गावाजवळ हा अपघात झाला. उभ्या कंटेनरला कारने पाठीमागून धडक दिल्यानंतर कार थेट कंटेनरखाली घुसली. अपघातावेळी गाडी कोण चालवत होतं, हे नेमकं स्पष्ट झालेलं नाही.

अपघातात जितेंद्र शेळके यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांची पत्नी आणि मुलगा हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमी मुलाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, तर अपघातानंतर बराच काळ पत्नी गाडीत अडकलेली होती.

नाशिकमधील महिला अत्याचार प्रकरणातील मुख्य संशयित अशोक खरात याच्या शिवनिका ट्रस्टचे जितेंद्र शेळके उपाध्यक्ष राहिले आहेत. शेळकेंच्या लॉन्समध्येही खरातची भागिदारी होती. अशोक खरातला अटक झाल्यापासून जितेंद्र शेळके तणावात होते.

राजकीय व प्रशासकीय पाठबळातून काही वर्षांत अशोक खरातयाच्या शिवनिका संस्थानला कोट्यवधींच्या देणग्या मिळाल्या होत्या. परंतु गोशाळेसाठी निधी संकलित करुनही काम पूर्ण झालं नाही, त्यामुळे विश्र्वस्तांमध्ये वाद निर्माण झाला. त्यातील तिघांनी राजीनामे दिले. सध्या संस्थानवर अध्यक्ष म्हणून अशोक खरात, उपाध्यक्ष म्हणून डॉ. जितेंद्र शेळके कार्यरत होते. सरचिटणीसपदी खरातची पत्नी कल्पना खरात असून, महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा रुपाली चाकणकर, सुभाष गमे, ललित पोफळे, डॉ. नंदकिशोर कातोरे हे विश्वस्त मंडळावर आहेत.

## भारताची मैत्री विसरला नेपाळ

वृत्तसेवा : बालेन यांच्या नेतृत्वात पूर्ण बहुमताने अलीकडेच नेपाळमध्ये नवीन सरकार स्थापन झालं आहे. मित्र नेपाळमध्ये नवीन सरकार सत्तेवर आल्यापासून पंतप्रधान बालेन शाह यांना भारताकडून प्रचंड प्रेम मिळालं आहे, विशेषतः तरुण पिढी शाह आणि त्यांच्या निर्णयांबद्दल अत्यंत उत्साही होती, पण आता बालेन यांनी आपला खरा चेहरा दाखवायला सुरुवात केली आहे.

सत्तेवर आल्यापासून त्यांनी भारताच्या विरोधात आपला पहिला निर्णय जारी केला आहे. या निर्णयाचा परिणाम भारत-नेपाळ सीमावर्ती भागात लगेचच जाणवू लागला असून नेपाळच्या सीमाशुल्क विभागाने सीमेवर भारतीय व्यापाऱ्यांचा लाखो रुपयांचा मालही जप्त केला आहे.

इनेपाळ सरकारने सीमापार व्यापारावरील पकड अधिक घट्ट केली असून या आदेशानुसार नेपाळमधून भारतात किंवा भारतातून नेपाळमध्ये जाणाऱ्या १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कोणत्याही वस्तूंवर आता सीमा शुल्क आकारले जाईल.

## विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस स्वतंत्र उमेदवार देणार?

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यातील विधानपरिषदेच्या नऊ रिक्त जागा आणि एका पोटनिवडणुकीसाठी राजकीय मोर्चेबांधणीला वेग आला असतानाच, महाविकास आघाडीत उमेदवारीवरून कलगीतुरा रंगण्याची चिन्हे आहेत. मविआच्या वाट्याला येणाऱ्या एका हक्काच्या जागेवर उद्धव ठाकरे स्वत: रिंगणात उतरणार की अन्य शिलेदाराला संधी दिली जाणार, याबाबतचा सस्पेंस कायम असतानाच आता काँग्रेसनेही शड्डू ठोकला आहे.



प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी थेट दिल्ली गाठून हायकमांडकडे स्वतंत्र उमेदवारासाठी आग्रह धरल्याने आघाडीच्या ऐक्यावर प्रश्र्नचिन्ह उभे राहिले आहे. या सत्तासंघर्षात आता शरद पवार गटाचे १० आमदार 'किंगमेकर'च्या भूमिकेत असून, त्यांच्या मतांचे पारडे ज्या बाजूला झुकेल, त्याचाच मार्ग सुकर होणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ नियमित आणि एका रिक्त जागेच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या १२ मे रोजी यासाठी मतदान पार पडणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर होतील. सध्याच्या पक्षीय बलाबलानुसार सत्ताधारी महायुतीचे पारडे जड असून भाजपच्या वाट्याला ५, शिंदेंच्या शिवसेनेला २ आणि अजित पवार गटाला १ जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, विरोधी पक्षांकडे असलेल्या मर्यादित संख्याबळामुळे महाविकास आघाडीला केवळ एका जागेवर निर्धोक विजय मिळवता येणे शक्य आहे.

नऊ जागांच्या निवडणुकीत एका उमेदवाराला विजयासाठी २९ मतांच्या कोट्याची गरज आहे. महाविकास आघाडीकडे सध्या एकूण ४६ (उबाठा २०, काँग्रेस १६ आणि राष्ट्रवादी शरद पवार गट १०) आमदार आहेत. या संख्याबळावर एक उमेदवार सहज निवडून येऊ शकतो, परंतु दुसऱ्या जागेसाठी १० ते १२ अतिरिक्त मतांची जुळवाजुळव करण्याचे मोठे आव्हान मविआसमोर असेल. राज्यसभेच्या वेळी झालेल्या राजकीय तडजोडीनुसार, यावेळी शरद पवार गटाने माघार घ्यावी आणि ही जागा उबाठाला सोडावी, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, काँग्रेसने आता या जागेवर आपला दावा ठोकल्याने तिढा वाढला आहे.

# महिला आरक्षणामुळे दक्षिणी राज्यांचे कोणतेही नुकसान नाही : अमित शाह

**वृत्तसंस्था**

**दिल्ली :** लोकसभेत महिला आरक्षण विधेयकावर चर्चा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दक्षिण भारतातील राज्यांच्या लोकसभा जागा कमी होणार असल्याच्या आरोपांना ठामपणे फेटाळले. तसेच जातीय जनगणना आणि परिसीमन या मुद्द्यांवरही त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली.



या विषयावर काँग्रेस खासदार प्रियंका वाड्रा यांच्या भाषणानंतर उत्तर देताना अमित शाह म्हणाले की, काही गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक आहे, जेणेकरून जनतेच्या मनात कोणताही संभ्रम राहू नये. त्यांनी सांगितले की, तीन विधेयकांमुळे दक्षिणेकडील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होईल, असा एक चुकीचा कथन (नॅरेटिव्ह) तयार केला जात आहे, जो पूर्णपणे चुकीचा आहे.

सध्या लोकसभेत ५४३ खासदार आहेत. कर्नाटकचे सुमारे १५ टक्के प्रतिनिधित्व आहे, जे संविधान दुरुस्तीनंतर २८ वरून ४२ खासदारांपर्यंत वाढेल. आंध्र प्रदेशच्या २५ जागा ३८ होतील आणि त्यांचे प्रतिनिधित्व ४.६० टक्क्यांवरून ४.६५ टक्क्यांपर्यंत वाढेल. तेलंगणाचे प्रतिनिधित्व ३.१३ टक्क्यांवरून ३.१८ टक्के होईल. तमिळनाडूचे प्रमाण ७.१८ टक्क्यांवरून ७.२३ टक्क्यांपर्यंत वाढेल, तर केरळचे प्रमाण ३.६८ टक्क्यांवरून किंचित घटून ३.६७ टक्के राहील. शाह यांनी स्पष्ट केले की दक्षिणेकडील राज्यांचे एकूण प्रतिनिधित्व कमी न होता वाढेल. सध्या ५४३ पैकी १२९ खासदार दक्षिणेकडील राज्यांतून येतात, म्हणजे २३.७६ टक्के. पुढे हे प्रमाण १५० खासदारांपर्यंत जाईल आणि २३.९७ टक्के होईल. त्यांनी हेही नमूद केले की ते ही माहिती पूर्ण जबाबदारीने देत आहेत.

जातीय जनगणनेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की सरकारने हा निर्णय घेतला असून जातीय जनगणना निश्र्िचतपणे केली जाईल. सध्या इमारतींची मोजणी सुरू असून, लोकसंख्येची गणना करताना जातीनुसार माहितीही गोळा केली जाईल.महिला आरक्षणाबाबत त्यांनी सांगितले की ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी लोकसभेच्या जागांमध्ये सुमारे ५० टक्क्यांनी वाढ केली जाईल आणि त्यातील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील.परिसीमन आयोगाबाबतच्या शंकांवर त्यांनी सांगितले की सरकारने कोणताही बदल केलेला नाही आणि विद्यमान कायद्यानुसारच प्रक्रिया होईल. आयोगाचा अहवाल संसद मंजूर केल्यानंतरच लागू होईल. आगामी २०२९ पर्यंतचे निवडणुका जुन्या व्यवस्थेनुसारच होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# भाजप आतापर्यंत आमदार-खासदार फोडत होता, पण आता त्यांची मजल...; राज ठाकरे

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** लोकसभेत सादर करण्यात आलेल्या महिला आरक्षण आणि लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या माध्यमातून दक्षिणेतील राज्यांचं राजकीय महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जात असल्याचा आरोप काँग्रेसही इतर विरोधी पक्षांकडून केला जात आहे. या वादात आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही उडी घेतली असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

सरकारवर हल्लाबोल करताना राज ठाकरे म्हणाले की, भाजप गेली १० वर्ष पक्ष फोडत होता, आमदार, खासदार फोडत होता, राजकीय घरांमध्ये फूट पाडत होता, जातीच्या व धर्माच्या नावाखाली माथी भडकवत होता, पण आता त्यांची मजल देशात दोन गट पाडण्यापर्यंत गेली आहे. डिलिमिटेशनच्या नावाखाली स्वतःची सत्ता अबाधित ठेवण्यासाठी भारतीय जनता पक्ष जो प्रयत्न करत आहे, त्यांनी हा देश कायमचा दुभंगेल व राज्याराज्यांत स्वायत्ततेची मागणी सुरु होईल. एवढेच नव्हे तर याचे परिणाम आपल्या संरक्षण आणि गृह विभागात देखील दिसून येतील. अवघ्या काही दशकांपूर्वी पंजाबमध्ये खलिस्तानच्या मागणीने काय रक्तरंजित संघर्ष उभा केला होता हे विसरू नका. जो असंतोष पंजाबमध्ये निर्माण झाला होता, तसा असंतोष उद्या ईशान्य भारतातील राज्यांपासून ते दक्षिणेतील राज्यांमध्ये निर्माण झाला तर काय? आणि अशी परिस्थिती उद्भवली तर त्याला भाजपची सत्तेची राक्षसी महत्त्वाकांक्षा जबाबदार असेल हे नक्की, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.



ज्या सरदार वल्लभभाई पटेलांच्या नावाने राजकारण करता आणि मतं मागता, त्या वल्लभभाईंना हा देश एकत्र आणताना काय संघर्ष करावा लागला होता हा इतिहास भाजपच्या लक्षात असेल असं मी गृहीत धरतो. त्या संघर्षाला तुमच्या स्वार्थासाठी मातीमोल करू नका. गुजरात , पश्र्िचम बंगाल, पंजाब , महाराष्ट्र, गोवा , आंध्रप्रदेश , तेलंगणा , तामिळनाडू , कर्नाटक , केरळा , आसाम तसेच पूर्वेकडील राज्यांच्यासाठी किमान हमी जागा द्या आणि उरलेल्या लोकसंख्येनुसार जागांचे वाटप करा, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली आहे. तसंच सध्या केंद्र सरकार जे करत आहे तो एक प्रकारे आगीशी खेळ खेळत आहेत. लोकसभा हा आकड्यांचा आखाडा बनवून त्यांना सत्तेत रहायचं आहे. पण त्यांना हे समजत नाहीये की आज ना उद्या याने भारताच्या संघरचनेच्या पायालाच धक्का लागेल आणि त्यातून या देशात अराजकता माजायला वेळ सुद्धा लागणार नाही, असा इशारा राज यांनी दिला आहे.

एकीकडे लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेला विरोध करत असताना महिला आरक्षणाला आपला पाठिंबा असल्याचं राज ठाकरेंनी स्पष्ट केलं आहे. सध्या केंद्र सरकारने लोकसभा मतदारसंघ पुनर्रचना, महिला आरक्षण विधेयक यामार्फत सत्तेचा अमरपट्टा स्वतःकडे राहील, याची तरतूद करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. १३१ व्या घटना दुरुस्तीतून लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना व त्यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रयत्न असल्याचं दाखवलं गेलं. पण मग अचानक या विधेयकावर चर्चा सुरू असताना केंद्र सरकारने काल रात्री अधिसूचना काढून घोषित केलं की २०२३ चं महिला आरक्षण विधेयक आजपासून लागू झालं. जर यातील बदलांवर चर्चा सुरू असेल तर मग ही घाई का करण्यात आली? केंद्र सरकारला नक्की काय साध्य करायचं आहे? महिला आरक्षण विधेयकाला आमचा अजिबात विरोध नाही, उलट महिलांना आरक्षण मिळतंय, ही तर आनंदाची बाब आहे. त्यामुळे आज या दुरुस्तीला मनसेसह इतर राजकीय पक्ष जो विरोध करत आहेत तो काही महिला आरक्षणाला विरोध नाही हे समजून घ्यावं. मुळात महाराष्ट्राला महिला आरक्षण इत्यादी बाहेरच्यांनी शिकवू पण नये. कारण याच राज्याने स्थानिक स्वराज्य संस्थात महिला आरक्षण आणलं, असंही राज यांनी सरकारला ठणकावून सांगितलं आहे.

# अघोरी कृत्यांनी चंद्रपूर हादरले : कासव- घुबडासह मांत्रिकाचा विधी ,विधवा-कुमारिकांचा वापर

चंद्रपूर : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे महाराष्ट्र हादरलेला असतानाच चंद्रपूर जिल्ह्यातही अघोरी पूजेचा प्रकार उघडकीस आला आहे. मागील दोन वर्षांपासून गुप्तधनाच्या आमिषाने कुमारिका आणि विधवा महिलांचा अघोरी पूजेसाठी वापर केला जात असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.

व्हीओ : चंद्रपूर जिल्ह्यातील सावली तालुक्यातील चिंचडोह बॅरेज परिसरात मागील आठवड्यात कासवांची तस्करी पकडल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. या प्रकरणात महिलांचे मोठ्या प्रमाणावर लैंगिक शोषण झाल्याची शक्यता वर्तविली जात आहे. सावली वनपरिक्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी १२ एप्रिल रोजी तीन दुचाकींवरून दोन जिवंत कासवांची तस्करी करणाऱ्या सहा जणांना अटक केली. गंगाधर बुरांडे, मोरेश्र्वर देवतळे, ओम शिंदे, हेमचंद शेंडे, धवल वेलादी आणि राजेंद्र दिवसे अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींचे मोबाईल तपासले असता वनअधिकाऱ्यांना जबर धक्का बसला. या मोबाईलमध्ये वन्यजीव तस्करीसोबतच अघोरी पूजेचे अत्यंत किळसवाणे व्हिडिओ आणि चॅटिंग आढळले. स्मशानभूमीत मध्यरात्री केलेल्या अघोरी पूजेचे व्हिडिओ चित्रीकरण, घुबड आणि कासवांचे फोटो, तसेच अनेक तरुण मुली आणि विधवा महिलांचे फोटो, त्यांच्या जन्मकुंडल्या आणि इतकेच नव्हे तर त्यांच्या खासगी अवयवांचे फोटोही हाती लागले आहेत. काही महिलांच्या मासिक पाळीच्या तारखांची नोंदही आरोपींनी ठेवली होती. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.





या टोळीचे जाळे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील चिमूर, पोंभुर्णा आणि चामोर्शी अशा ग्रामीण भागांत पसरलेले आहे. या रॅकेटमध्ये जवळपास ५० मध्यस्थ कार्यरत असून ते 'शिकार' शोधण्याचे काम करत होते. हे मध्यस्थ महिलांच्या जन्मकुंडल्या आणि त्यांचे व्हिडिओ मुख्य मांत्रिकाकडे पाठवितात. या वर्तुळात मांत्रिकाला 'टेस्टर' म्हटले जात होते. एखादी महिला किंवा प्राणी अघोरी पूजेसाठी 'योग्य' आहे की नाही, हे हा टेस्टर ठरवत असे. त्यानंतर निर्जन स्थळी किंवा स्मशानभूमीत अघोरी विधी पार पाडले जात होते. पैशाचा पाऊस पाडणे आणि गुप्तधन मिळवून देण्याच्या नावाखाली श्रीमंत आणि गरीब अशा दोन्ही स्तरांतील लोकांना फसवले जात होते. आरोपींनी अघोरी पूजेतून सोन्याची बिस्किटे मिळाल्याचा बनाव रचला होता, मात्र वनविभागाच्या छाप्यादरम्यान ती बिस्किटे बनावट असल्याचे उघड झाले. सध्या सर्व सहा आरोपी वनकोठडीत असून, मुख्य सूत्रधार असलेला मांत्रिक आणि महाराज अद्याप फरार आहेत.

हे प्रकरण अत्यंत गंभीर आणि गुन्हेगारी स्वरूपाचे असल्याने लवकरच हा तपास पोलिस विभागाकडे वर्ग केला जाणार आहे. घुबड आणि कासव यांचा संबंध आपल्या पुराणांमध्ये धनसंपत्तीशी जोडला जातो. त्यामुळे अघोरी पूजेत त्यांचा वापर केला जातो. विधवा महिला आणि कुमारिका या मांत्रिकांचे सहज सावज ठरतात. त्यांच्या पाठीशी कुणी नसल्याने त्यांचे शोषणही पूजेच्या निमित्ताने केले जाते, अशी माहिती अंनिसचे कार्यकर्ते हरीभाऊ पाथोडे यांनी दिली.

या प्रकरणामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, भोंदूगिरीच्या या विळख्यात अजून किती महिला अडकल्या आहेत, याची धक्कादायक माहिती तपासाअंती समोर येण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील मांत्रिकापर्यंत पोहचणाचा प्रयत्न सुरु आहे. दरम्यान या प्रकरणात गुरुवारी (ता. १६) आणखी दहा जणांना ताब्यात घेतले आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आतापर्यंत ३३७मुलींना एचपीव्ही लस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** एचपीव्ही (ह्युमन पॉपिलोमा व्हायरस) लसीमुळे मुलींच्या प्रजनन क्षमतेवर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. उलट गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा धोका ८५ टक्क्यांनी कमी होतो. त्यामुळे सोशल मीडियावरील गैरसमज आणि अफवांवर विश्वास न ठेवता पालकांनी आपल्या पात्र मुलींना ही लस आवर्जुन द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

महिलांच्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने केंद्र सरकारने १४ वर्षे पूर्ण आणि १५ वर्षाच्या आतील मुलींसाठी ही लस मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर जिल्ह्यात ९ मार्चपासून हे लसीकरण सुरु झाले असून आतापर्यंत ३३७ मुलींना ही लस देण्यात आली आहे.



## विविध वृत्त...

## पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल : वीरशैव लिंगायत समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी, कला, समाजप्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना दरवर्षी महात्मा बसवेश्र्वर सामाजिक समता शिवा पुरस्कार दिला जातो. प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एक व्यक्ती व एक संस्था अशा दोन घटकांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.**

**या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र व्यक्ती, संस्थांनी आ-पले प्रस्ताव तीन प्रतीत येत्या २० एप्रिल २०२६ पर्यंत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर यांच्या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.**

## जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांची रविवारी निघणार भव्य शोभा यात्रा

### भरगच्च कार्यक्रम,जोरदार तयारी : मोठया संख्येने सहभागी होण्याचे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** जगतज्योती महात्मा बसवेश्-वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने शहरात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जयंतीची जोरदार तयारी सुरू आहे.आझाद चौक येथून रविवारी महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य शोभा यात्रा निघणार आहे.

जयंती निमित्त शहरात भरगच्च कार्यक्रम पार पडणार असून त्यामध्ये शनिवार दि.१८ एप्रिल रोजी रात्री ०७:३० वाजता महात्मा बसवेश्र्वर चौक रिंगरोड येथील बसवेश्र्वरांच्या अश्र्वारूढ पुतळा समोर उभारण्यात आलेल्या इलईडी नामफलक बोर्डाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याच ठिकाणी लागलीच भव्य अशी आगळी-वेगळी अतिषबाजी करण्यात येणार आहे.मध्यरात्री महात्मा बसवेश्र्वर कॉलेज समोरील महात्मा बसेश्र्वरांच्या पुतळ्यास गवळी समाजाच्या वतीने दुग्धभिषेक होईल.रविवार दि.१९ एप्रिल रोजी सकाळी ठीक ८ वाजता महात्मा बसवेश्र्वर चौक रिंगरोड येथे आपणां सर्वांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात येणार आहे.



श्री पाचशेघर मठ येथे दुपारी १२:०५ वाजता बसव जन्मोत्सव पाळणा होईल.रविवारी सायंकाळी ५ वाजता महात्मा बसवेश्र्वरांच्या प्रतिमेची आझाद चौक ते महात्मा बसवेश्र्वर कॉलेज भव्य शोभा यात्रा निघणार आहे.

जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमात समाज बांधवांसह लातूरकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा बसवेश्र्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ड.निलेश मुचाटे,स्वागताध्यक्ष प्रा.भालचंद्र येडवे पाटील यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक सिद्रामआप्पा पोपडे,माजी अध्यक्ष केदारआप्पा रासुरे,उपाध्यक्ष विश्वास आंबेकर,सचिव बाल-ाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे,कोषाध्यक्ष लखन कावळे, कार्याध्यक्ष मुकेश उटगे,बालाजी पाटील रायवाडीकर,गणेश हेरकर,संयोजक नितीन मोहनाळे,जगदीश येरटे,बसवेश्र्वर हेंगणे,प्रा. ओमप्रकाश झुरुळे,ड. निखिल काळगे, सोमेश्र्वर ईश्र्वरशेटे, शिवकुमार रोडे,प्रमोद धुपे,लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे,सुशील वेळापुरे,निखिल शेटकार, शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे,मोहन मेंगशेट्टे, सुनील ताडमाडगे,किरण खोबरे आदिसह समाज बांधवांनी केले आहे.

## केज तहसीलदार अपघात प्रकरणी १५ जणांची चौकशी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** रेणापूर पिंपळफाट्यापासून न जवळ असलेल्या नेहरुनगरजवळ लातूर-गी अंबाजोगाई राष्ट्रीय महामार्गावर १. (दि. ९) रोजी पहाटे केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांचे अपघाती निधन झाले होते. र त्यांच्या अपघातावरुन तर्क-वितर्क १. काढले जात असताना घटनेनंतर सातव्या दिवशी १५ जणांची चौकशी करण्यात आली आहे. पोलीस तपासात हा अपघातच असल्याचा प्राथमिक अंदाज
वर्तविला जात आहे.

३१ वर्षीय केजचे तहसीलदार राकेश गिड्डे हे ८ एप्रिल रोजी सकाळी आपल्या सहकाऱ्यांसोबत लातूरला आले होते. त्यांनी स्वतःची कार ही अंबाजोगाई येथील कारखान्यावर पार्क केली होती. लातुरातील काम आटोपून ते अंबाजोगाईकडे गेल्याचेही सीसीटीव्हीमध्ये दिसून आले आहे. त्यानंतर सहकाऱ्यांना सोडून दिवंगत गिड्डे हे स्वतःची कार घेऊन रेणापूरकडे
मार्गस्थ झाले होते. यानंतरच त्यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. कारमधील ते दोघे कोण? शिवाय रेणापूरकडे येताना ते एकटेच दिसत होते तर इतर सहकारी गेले कुठे ? असे एक ना अनेक प्रश्र्न उपस्थित होत आहेत. याप्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला असून गुरुवारपर्यंत १५ जणांची चौकशी करण्यात आली आहे. त्यामुळे तपासात आणखीन काय समोर येणार हे पहावे लागणार आहे.

## औसा टी-पॉईंटवरील अपघातात एक ठार, एक गंभीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** औसा टी-पॉईंट परिसरात गुरुवारी सकाळी ९.१० वाजता झालेल्या भीषण अपघातात खोपेगाव येथील विजयकुमार सिताराम बर्डे (वय ५५) यांचा मृत्यू झाला असून त्यांचा मुलगा अक्षयकुमार विजयकुमार बर्डे (वय ३५) हा गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात दुचाकीवर बांधलेला एक बकराही ठार झाला असून घटनेमुळे परिसरात काहीकाळ तणावाचे वा-तावरण निर्माण झाले.

प्राथमिक माहितीनुसार, विजयकुमार व अक्षयकुमार बर्डे हे दोघे स्प्लेंडर मोटरसायकल (क्र. एमएच २४ ७२०२) वरून औसा बाज-ारातून दोन बकरे खरेदी करून खोपेगावकडे जात होते. ते औसा टी-पॉईंटजवळ पोहोच-ताच उमरग्याकडून लातूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारने (क्र. एमएच २४ एबी ५४००) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की दोघेही रस्त्यावर फरपटत गेले.

**उड्डाणपुलाची गरज पुन्हा ऐरणीवर**

या भीषण अपघातानंतर औसा टी-पॉईंटवरील उड्डाणपुलाचा प्रश्र्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या ठिकाणी चारही बाजूंनी होणारी वाहतूक, वेगाने धावणारी वाहने आणि सततची कोंडी यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अनेकांनी यापूर्वीही येथे जीव गमावला आहे. 'रस्ते प्राधिकरण अजून किती बळींची वाट पाहणार?' असा संतप्त सवाल नागरिक आणि प्रवासी उपस्थित करत असून, तातडीने उड्डाणपूल उभारण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

अपघातात विजयकुमार बर्डे गंभीर जखमी झाले, तर अक्षयकुमार यांनाही गंभीर दुखापत झाली. स्थानिकांच्या मदतीने दोघांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र उपचारादरम्यान विजयकुमार बर्डे यांचा मृत्यू झाला. या अपघा-तात मोटरसायकलवर बांधलेल्या दोन बकऱ्यांपैकी एक बकरा जागीच ठार झाला.

घटनेची माहिती मिळताच औसा पोलिसांनी घटनास्थळ धाव घेत पंचनामा केला कारचालकाविरुद्ध निष्काळजीपण वाहन चालविल्याप्रकरणी गुन्ह दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अपघातामुळे काह काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. १७ एप्रिल :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत १४ ते २० एप्रिल दरम्यान, राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांत संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय या विषयी जागरुकता निर्माण करणे हा आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिलेल्या लिंकवर निबंध अपलोड करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा व्यवसाय
शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी. जे. औताडे यांनी केले आहे. गट १ साठी आयटीआय, डिप्लोमा, बायफोकल, एसीव्हीसी विद्यार्थ्यांसाठी शब्दमर्यादा ५०० ते ८०० असणार आहे. गट -२ साठी पुरुष, महिलांसाठी खुला गट शब्द मर्यादा ८०० ते ते १२०० असेल. दोन्ही गटांतील प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये व सन्मानपत्र, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक २१ हजार, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ११ हजार रूपयांचे असेल.

## एमआयडीसीतील कंपनीत स्फोट,एका मजुराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. १७ एप्रिल :**शहरातील जुन्या एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत कोटींग प्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या बॉयलरचा अचानक स्फोट झाल्याची घटना गुरुवारी (दि. १६) दुपारी ४ च्या सुमारास घडली. यामध्ये कंपनीतील एका मजूराचा होरपळून मृत्यू झाला तर कंपनीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

शहरातील एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील जुनी एमआयडीसी परिसरात मुंदडा ट्रेडर्स ही अॅल्युमिनियम कोटिंग व अॅल्युमिनियम शीट निर्मिती करणारी कंपनी आहे. कंपनीला आग लागल्याच्या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी-कर्मचारी महापालिका अग्निशमन दल व एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल करण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून २ तासांत आग नियंत्रणात आणून विझविण्यात यश मिळविले.

सदर घटनेमध्ये मुंदडा ट्रेडर्स या युनिटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. या स्फोटात काम करणारे दोन कामगार गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी दत्ता बुरांगे, (रा. प्रकाश नगर, लातूर) हे मयत झाले असून अभी कुमार, मूळ रा. उत्तर प्रदेश हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटामुळे परिसरातील इतर कोणत्याही औद्योगिक युनिटला कोणतेही नुकसान झाले-ले नाही. घटनेच्या अनुषंगाने मनपाचे उपायुक्त डॉ. खानस-ोळे, फायर ऑफिसर जाधव यांना घटनास्थळी दाखल झाले होते. तसेच उपविभागीय पो-लीस अधिकारी, लातूर शहर कार्यालयामार्फत फॉरेन्सिक तपासणी पथकासही पाच-ारण करण्यात आले होते. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी अधिक तपास करीत आहेत.

## उपसंचालक कार्यालयासमोर शिक्षक सेनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. १७ एप्रिल : शिक्षकांचे रखडलेले वेतन, थकित देयकांसह अशैक्षणिक कारभाराचा निषेध करण्यासाठी शिक्षक सेनेने गुरूवारी लातूरच्या शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करीत प्रशासनाच्या उदासिनतेचा निषेध केला.**

**शिक्षण विभागाच्या विसंगत निर्णयांने हजारो शिक्षक आर्थिक, मानसिक दडपणाखाली आले आहेत. वारंवार विनंती करूनही प्रश्र्न सुटत नसल्याने शिक्षक रस्त्यावर उतरले. यावेळी शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांना शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे यांच्यासह शिक्षक सेनेच्या पदाधिकारी, सदस्यांनी मागण्यांचे निवेदन दिले. निवेदनात अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन व वेतन थांबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.**

**गेल्या २ ते ६ वर्षांपासून शिक्षकांची हक्काची देयके थकली असून, निधी उपलब्ध असूनही अधिकाऱ्यांच्या दिरंगाईने कोट्यवधींचा निधी व्यपगत झाला. शिक्षकांना बीएलओ कामातून मुक्त करावे. मार्च महिन्याचे वेतन अद्याप मिळा-लेले नही. परीक्षा काळात पट पडताळणी करू नये. पडताळणी सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यांत करावी, यासह अन्य मागण्यांचा समावेश होता. याप्रसंगी शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद हुडगे, मुनीरखान पठाण, सचिन साबणे रवी भोसले, बाळासाहेब येळापु बालाजी पांचाळ, खुदबोद्दीन, भरत कोरे, दीपव जामकर, व्यंकुराम बोनवळे बालाजी बिडवे उपस्थित होते.**

## संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलचे यश







**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** केंद्रीय शिक्षण बोर्डाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या इयत्ता १० परीक्षेत शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला असून दरवर्षाप्रमाणे यावर्षीही निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतील तब्बल ३२ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले असून ७० विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. एकूण १८२ विद्यार्थ्यांपैकी १४३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह म्हणजेच ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतून प्रथम क्रमांक चिन्मयी सूर्यवंशी ९८.८० टक्के गुण घेऊन मिळवला तर द्वितीय क्रमांक महावीर प्रशांत येरमाळकर (९८.२०%) व तृतीय क्रमांक समृद्धी हरीश थोरमोटे पाटील (९७.८०%) या विद्यार्थिनीने मिळवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. अजय जाधव, सचिव बी. बी. ठोंबरे, सहसचिव शिवाजी सूर्यवंशी व उद्धवराव पाटील, सचिदानंद पाटील व बी. ए. मैंदर्गे, प्राचार्या वीणा कोपकर, उपप्राचार्य राजेंद्र ढिवरे पंकज बागडे, बाळासाहेब राठोड, स्मिता साळुंके तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## लवकरच ग्रामसेवकांच्या प्रशासकीय बदल्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** बहुचर्चित ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या विनंती, आपसी व प्रशासकीय बदल्यांचे प्रयोजन तयार ठेवले आहे. यंदा लवकरच बदल्या होतील. फक्त राज्य सरकार बदल्यांबाबत काय निर्देश देते, यावर असेल, अशी माहिती पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिली.

राज्य सरकारने जणगनणेचा मुद्दा पुढे केला तर कदाचित बदल्या यावर्षी थांबू शकतात. केंद्र सरकारने मात्र एक पत्र काढून जणगनणेसाठी ज्या कर्मचाऱ्याची निवड झाली, त्यांना बदली प्रक्रियेतून वगळावे, असे सूचित केले आहे. आता राज्य सरकार काय निर्देश देते, याकडे पंचायत विभागाचे लक्ष लागले आहे. बदल्यांची प्रक्रिया केली तर ती १० ते १५ मेपर्यंतच करावी लागणार आहे. कारण, लातूर जिल्ह्या-तील सर्व बीडीओ मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सहभागी झालेल्या गावांची तालुकास्तरीय पाहणी करण्यासाठी २६ एप्रिलपासून पुढे वीस दिवस सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात आहेत.

फक्त राज्य सरकारच्या बरेच अवलंबून पत्राची उत्सुकता झाल्यातरी आहेत. बीडीओ आल्यानंतर १० ते १५ मे दरम्यान, ग्रामसेवकांच्या विनंती, आपसी व प्रशासकीय बदल्या करण्याची तयारी केली आहे, असे नमूद करून वाघ म्हणाले, बदल्या शासन पत्राच्या अधिन राहून केल्या जातील. पुढे १६ मेपासून वीस दिवस उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हास्तरीय गाव पाहणीसाठी

जिल्ह्यातील ग्रामसेवक संघटनेचे मोजके पदाधिकारी यंदा प्रशासकीय बदल्या होणार नसल्याच्या वावड्या उठवत आहेत. परंतु, त्यांची माहिती अपूर्ण आहे. जि. प.त पडीक राहणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी तरी वावड्यांबद्दल पदाधिकाऱ्यांना सांगावे, अशी चर्चा आहे.

## सोन्यावरचं कर्ज : वैयक्तिक कर्जाचा नवा चेहरा?

मजबुरीतून सुरू झालेलं हे कर्ज आज आर्थिक प्रगतीचं प्रभावी साधन कसं बनत आहे?

योग्य वापर केलं, तर सोन्यावरचं कर्ज अडचणीतून बाहेर काढणारंच नव्हे, तर पुढे नेणारं साधन ठरू शकतं. भारतीय घरांमध्ये सोनं हे केवळ दागिना नसतो; तो विश्र्वासाचा साठा असतो. संकटाच्या वेळी उपयोगी पडणारी एक न बोलता दिलेली खात्री. पण एक काळ असा होता की घरातलं सोनं गहाण ठेवणं म्हणजे आर्थिक अडचणीची जाहीर कबुली मानली जायची.

बँका, छइत्रक्षउ आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे सोन्यावर कर्ज काही तासांत उपलब्ध होतं-सोपं, पारदर्शक आणि विश्र्वासार्ह.

हे कर्ज आता व्यवसाय वाढवण्यासाठी, तातडीच्या संधी साधण्यासाठी, तसेच इतर महागड्या कर्जांची जागा घेण्यासाठी वापरलं जातंहे.

वाढीमागचं वास्तव गेल्या काही वर्षांत सोन्यावरच्या कर्जात झपाट्याने वाढ झाली आहे. २०२२ पासून जवळपास ३.८ पट वाढ होऊन आज हे कर्ज घरकर्जानंतर दुसऱ्या क्रमांकावर पोहोचलं आहे.

या वाढीमागे एक महत्त्वाचं कारण म्हणजे सोन्याच्या किमतीत झालेली सातत्यपूर्ण वाढ. दर वाढल्याने त्याच सोन्यावर अधिक कर्ज मिळू लागलं आहे. याशिवाय, सोन्यावरचं कर्ज घेण्याची प्रक्रिया कमी वेळखाऊ, सोपी आणि तुलनेने कमी खर्चिक आ

२०२५ मध्ये गोल्ड लोन घेताना कर्जदारांची स्थिती ७४% - १ लाखांपेक्षा जास्त आधीच कर्ज अस-लेले २६% - कमी किंवा कोणतेही कर्ज नसलेले बहुतांश कर्जदार आधीच आर्थिक व्यवहारात सक्रिय आहेत- आणि गोल्ड लोन त्यांच्यासाठी पूरक साधन बनत आहे.

सोन्यावरचं कर्ज आज अनेक बाबतीत वैयक्तिक कर्जापेक्षा सोयीचं ठरतं-जलद प्रक्रिया, कमी कागदपत्रं आणि तुलनेने कमी व्याजदर.

सोनं बँकेच्या सुरक्षित ताब्यात राहतं, त्यामुळे ग्राहकाला सुरक्षिततेचीही खात्री मिळते. मालमत्तेवर कर्ज घेण्याच्या तु-लनेत येथे प्रक्रिया जलद, खर्च कमी आणि तांत्रिक गुंतागुंतही कमी असते. म्हणूनच ते तारण असलेलं वैयक्तिक कर्ज म्हणून पुढे येत आहे.

बदलती कर्ज संस्कृती लातूरमधील एका छोट्या व्यावसायिकाचं उदा-हरण घ्या- सुरुवातीला व्यवसायासाठी घेतलेलं सोन्यावरचं कर्ज, त्यानंतर योग्य नियोजनासोबत टॉप-अप घेऊन त्याने व्यवसाय वाढवला. ही आता अपवादात्मक गोष्ट नाही-ती एक संधी ओळखण्याची पद्धत बनत आहे. सोन्यावरचं कर्ज आता तात्पुरती मदत नसून, आर्थिक प्रवासाला गती देणारं साधन बनत आहे.

सुविधा आणि शिस्त - दोन्ही आवश्यक सोन्यावरचं कर्ज हे योग्य पद्धतीने वापरलं, तर अत्यंत प्रभावी आर्थिक साधन ठरू शकतं. तारण असल्यामुळे व्याजदर नियंत्रित राह-तात आणि कर्जप्रक्रिया जलद होते. अर्थात, कोणत्याही कर्जाप्रमाणेच येथेही शिस्त आवश्यक आहे. योग्य नियोजन, वेळेवर परतफेड आणि कर्जाचा योग्य उपयोग-या तिन्ही गोष्टी लक्षात घेतल्या, तर हे कर्ज प्रगतीचं साधन ठरू शकतं.

स्पर्धेचं नवं रूप बँका गोल्ड लोन देताना वींश वळश्रळसशपलश, उत्पन्नाचा आढावा आणि कर्जाच्या वापराची पडताळणी करतात. यामुळे अनेक ग्राहक-विशेषतः तातडीची गरज असलेले सेश्रव श्रेरप कर्जप्रक्रियेतील वेग आणि सुलभता-हीच या क्षेत्रातील वाढीची गुरुकिल्ली ठरते आहे.२.५ लाखपर्यंत - ८५% ङ्ढत २.५ ते ५ लाख - ८०% ५ लाखांपेक्षा जास्त - ७५% वाढ हवी, पण शिस्तीसह - हा त्यामागचा स्पष्ट हेतू आहे.सामाजिक बाजू भारतात सोनं मुख्यतः महिलांच्या मालकीचं असल्याने महिला कर्जदारांची भूमिका वाढत आहे.

हे आर्थिक समावेशनासाठी सकारात्मक आहे. योग्य वापरासोबत हे कर्ज महिलांसाठीही आर्थिक स्वावलंबनाचं साधन ठरू शकतं.समारोप सोन्यावरचं कर्ज भारताच्या बदलत्या आर्थिक वास्तवाचं प्रतीक आहे-सुलभ, जलद आणि सर्वांसाठी उपलब्ध.आज प्रश्र्न असा नाही की कर्ज घ्यावं का;प्रश्र्न असा आहे की ते किती सुजाणप-णे घ्यावं.योग्य नियोजन, योग्य उद्देश आणि योग्य परतफेड-या तिन्ही गोष्टींचा समतोल साधला, तर सोन्यावरचं कर्ज केवळ गरज भागवणारं नसूनआर्थिक प्रगतीचं प्रभावी साधन ठरू शकतं.

**-: नवनीत भंडारी**
**व्यवस्थापकीय संचालक लातूर अर्बन को ऑप बँक लि., लातूर**

## क्रांतिवीर उमाजी नाईक पुरस्काराची प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी कला, समाज प्रबोधन आणि साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना क्रांतिवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार प्रदान करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या पुरस्कारासाठी लातूर जिल्ह्यातील पात्र साहित्यिक, समाजप्रबोधनकार, समाजसेवक आणि संस्थांनी २० एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

विहित नमुन्यातील हे प्रस्ताव तीन प्रतीत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करणे

## संक्षिप्त वृत्त...

### रजा मंजुरीसाठी ५०० रुपयांची लाच मागणाऱ्या वाहतूक निरीक्षकाला रंगेहाथ पकडले

लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्य परिवहन महामंडळाच्या परभणी आगारातील वाहतूक निरीक्षकाने रजा मंजूर करून देण्यासाठी लाच मागितल्याचा प्रकार उघडकीस आला असून, लाचलुचपत प्रतिबंध विभागाने सापळा रचून संबंधित अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे परिवहन विभागात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणी आगारात कार्यरत असलेल्या ३५ वर्षीय चालकाने २१ एप्रिल रोजी मित्राच्या लग्नासाठी एक दिवसाची रजा मंजूर करून घेण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, ही रजा मंजूर करण्यासाठी वाहतूक निरीक्षक रतन नामदेव शेलार (वय ४७) यांनी तक्रारदाराकडे ५०० रुपयांची लाच मागितली.

याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार दाखल केली. १६ एप्रिल रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत शेलार यांनी पंचांच्या समक्ष लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर लगेचच सापळा रचण्यात आला. त्याच दिवशी बस स्थानक परिसरातील कार्यालयात सापळा कारवाई करण्यात आली. या वेळी शेलार यांनी तक्रारदाराकडून ५०० रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच त्याच्या मोबाईलची तपासणी आणि घरझडतीची कार्यवाहीही सुरू आहे. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक महेश पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक मनीषा पवार करीत आहेत.

### आर. पी. हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक फिजिओथेरपी सेंटर व स्पाइनल डिकॉम्प्रेशन युनिटचे उद्घाटन



**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी रस्त्यावरील आर. पी. हॉस्पिटल अॅन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे अत्याधुनिक फिजिओथेरपी सेंटर तसेच मराठवाड्यातील पहिले स्पाइनल डिकॉम्प्रेशन युनिटचे उद्घाटन नुकतेच पार पडले.

या नव्या सुविधेचे उद्घाटन आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमनी, डॉ. विवेक नावंदर महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमीर तडवी तसेच रामराव डोंगरे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. राहुल पाटील यांनी सांगितले की, या अत्याधुनिक सुविधेमुळे परभणीसह मराठवाडा विभागातील रुग्णांना दर्जेदार व प्रभावी उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. यावेळी डॉ. प्रमोद शिंदे यांनी नव्या युनिटविषयी माहिती देताना स्पष्ट केले की, स्पाइनल डिकॉम्प्रेशन युनिट हे मराठवाड्यातील पहिले असून, पाठीच्या कण्याशी संबंधित समस्या, डिस्क प्रोलॅप्स, नर्व्ह कॉम्प्रेशन, सायटिका यांसारख्या आजारांवर नॉन-शस्त्रक्रियात्मक आधुनिक उपचार येथे दिले जाणार आहेत. तसेच फिजिओथेरपी सेंटरमध्ये अत्याधुनिक उपकरणे, व्यायाम सुविधा आणि तज्ज्ञ फिजिओथेरपिस्ट्सची टीम रुग्णांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत राहील. या कार्यक्रमास महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एकाच दिवशी आगीच्या तीन घटना; आगीमध्ये तीन शेळ्या दगावल्या :

अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरात गुरुवारी एका दिवसात तीन वेगवेगळ्या ठिकाणी आगीच्या घटना घडल्या. या सर्व घटनांमध्ये महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तात्काळ प्रतिसाद देत आग नियंत्रणात आणल्याने मोठा अनर्थ टळला.

पहिली घटना दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास सुपर मार्केट रोड परिसरात घडली. येथे खुल्या जागेत साचलेल्या कचऱ्याला आग लागली होती. त्यानंतर दुपारी २.२० वाजता उड्डाण पूल, गंगाखेड नाका परिसरातही कचऱ्याला आग लागल्याची घटना घडली. तर तीसरी घटना कृषी कॉलनी येथे घडली. येथे शेख युनूस शेख खाऊम यांच्या पत्र्याच्या शेडला आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि आग नियंत्रणात आणली. या शेडमध्ये एकूण सहा शेळ्या होत्या. दुर्दैवाने आगीमध्ये तीन शेळ्यांचा मृत्यू झाला, तर अग्निशमन दलाचे जवान व स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे तीन शेळ्यांना वाचविण्यात यश आले. मात्र वाचलेल्या शेळ्या आगीच्या उष्णतेमुळे किरकोळ जखमी झाल्या आहेत.
या कारवाईत अग्निशमन अधिकारी दिपक कानोडे, फायरमन गौरव देशमुख, सर्जेराव मुंढे तसेच वाहन चालक इनायत अली यांनी सहभाग घेतला.

### परभणीत दहा दिवसीय आचार्य प्रांत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान संचलित विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थेच्या वतीने ३ ते १३ मे २०२६ या कालावधीत दहा दिवसीय आचार्य प्रांत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येत असून, यावर्षीचे आयोजन विद्याभारती परभणी शाखेच्या वतीने करण्यात आले आहे. हा प्रशिक्षण वर्ग गंगाखेड रस्त्यावरील ब्राम्हणगांव परिसरातील राजे संभाजी गुरुकुल येथे पार पडणार आहे. या प्रशिक्षणामध्ये शिशुवाटिका तसेच पूर्व प्राथमिक स्तरावर कार्यरत असलेले सुमारे २०० शिक्षक व आचार्य सहभागी होणार आहेत. प्रशिक्षणाच्या दरम्यान वैदिक गणित, कार्यकर्ता प्रशिक्षण तसेच अध्यापक प्रशिक्षण अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रशिक्षण वर्गाच्या अनुषंगाने व्यवस्थापनाची बैठक नुकतीच राजे संभाजी गुरुकुल येथे पार पडली. या बैठकीत विद्याभारतीचे प्रांत संघटन मंत्री शैलेश जोशी व प्रांत मंत्री दिनेश देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

# सेलू हादरले : चार मुलींना घेऊन २७ वर्षीय विवाहिता गूढरित्या बेपत्ताच

## लव्ह जिहाद'चा आरोप; पोलीसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू हादरले असून चार मुलींना घेऊन २७ वर्षीय विवाहितता गूढरीत्या बेपत्ता अपहरण की स्वेच्छेने पलायन? 'लव्ह जिहाद'चा आरोप; पोलीसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सेलू शहरातील मारोती नगर परिसरात राहणारी २७ वर्षीय विवाहित महिला आपल्या चार अल्पवयीन मुलींना सोबत घेऊन अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. १४ एप्रिल रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ही महिला घरातून निघून गेली. मात्र ती स्वेच्छेने गेली की तिचे अपहरण करण्यात आले, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने परिसरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी संबंधित महिलेच्या पतीने १४ एप्रिल रोजी सेलू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पतीच्या म्हणण्यानुसार, त्यांची पत्नी 'लव्ह जिहाद'च्या जाळ्यात अडकली असून तिचे अपहरण करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. तसेच आपल्या पत्नी व चार मुलींचा तात्काळ शोध घेऊन संबंधित आरोपीस अटक करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

चार अल्पवयीन मुलीही सोबत
विशेष म्हणजे, २०१२ साली विवाह झाल्यानंतर जन्मलेल्या १४, १०, ८ आणि ४ वर्षांच्या चार मुलींनाही संबंधित महिला सोबत घेऊन गेल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. मुलींच्या सुरक्षिततेबाबतही मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. तक्रार दाखल होऊनही पोलीसांकडून ठोस हालचाली होत नसल्याचा आरोप फिर्यादी पतीने केला आहे. पोलीस आरोपीची पाठराखण करत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, ही घटना पलायन आहे की अपहरण, याबाबत पोलीसांनी अधिकृत माहिती देणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**तपासाची दिशा अद्याप अस्पष्ट....**
दरम्यान, या प्रकरणात 'लव्ह जिहाद'चा आरोप केला जात असला तरी त्याबाबत कोणतेही अधिकृत पुष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. पोलीस तपासानंतरच संपूर्ण सत्य स्पष्ट होणार असून, सध्या तरी या गूढ बेपत्ता प्रकरणाने शहरात खळबळ उडाली आहे... या घटनेत चार लहान मुलींसह महिला बेपत्ता झाल्याने पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून तात्काळ शोध मोहीम राबवून सत्य समोर आणावे अशी मागणी होत आहे.

## मानवत शहर चोरट्यांच्या ताब्यात? बसस्थानकातून ५० हजारनंतर बाजारपेठेतून १ लाखांची थैली लंपास

**पोलिसांच्या कार्यक्षमतेवर संताप**

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत शहरात चोरट्यांचा अक्षरशः हैदोस सुरू असून सलग दोन दिवसांत चोरीच्या दोन मोठ्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एक दिवसापूर्वी बसस्थानक परिसरातून ५० हजार रुपये लंपास झाल्याची घटना ताजी असतानाच आता भरदिवसा गजबजलेल्या बाजारपेठेतून १ लाख रुपयांची रोकड असलेली थैली चोरट्यांनी पळविल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
नामदेव मस्के (रा. बोन्धरवाडी) यांच्या मुलीचे लग्न दि. १ तारखेला असल्याने दागिने खरेदीसाठी ते पत्नी व मुलीसह मानवत येथे आले होते. गोदू गल्ली परिसरातील राणी ज्वेलर्स येथे खरेदी करून परत जात असताना पत्नी व मुलगी पुढे पायी निघाल्या.
दरम्यान, नामदेव मस्के यांनी सोबत असलेली वायरची थैली, ज्यामध्ये तब्बल १ लाख रुपये रोकड होती, ती दुचाकीच्या मागील बाजूस असलेल्या हुकाला अडकवली होती. ते पत्नी व मुलीकडे जात असताना त्रिमूर्ती कॉर्नर ते मारोती मंदिर या अवघ्या ५० मीटर परिसरात अज्ञात चोरट्यांनी क्षणार्धात थैली लंपास केली.
घटनेची माहिती मिळताच पोलीस कर्मचारी शेख गाजीयोद्दिन, नारायण सोळंके व सुनील बावरी यांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील राणी ज्वेलर्स, काबरा दुकान व मानवत अर्बन बँकेच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. मात्र चोरट्यांचा माग काढण्यात यश आले की नाही, याबाबत स्पष्ट माहिती मिळालेली नाही.
लग्नसराईत चोरट्यांची नजर नागरिकांवर
सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात रोकड व दागिने घेऊन बाजारपेठेत येत आहेत. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी शहरात सक्रिय टोळ्या उभ्या केल्याची चर्चा सुरू आहे.
नागरिकांना इशारा- रोख रक्कम, दागिने किंवा मौल्यवान वस्तू वाहनावर उघडपणे ठेवू नयेत, गर्दीच्या भागात अधिक सतर्क राहावे, संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### भूमापन दिनानिमित्त कार्यालयीन कामात उत्कृष्ट कार्याबद्दल भुमी अभिलेख कर्मचाऱ्यांचा सत्कार



**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा येथील भुमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयातील कर्मचारी अनिल दिगंबरराव शिरडकर व नागेश गुरले यांनी कार्यालयीन कामकाजात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचा परभणी येथे जिल्हा कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.परभणी येथील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात नुकताच भूमापन दिन साजरा करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यय स्थानी जिल्ह्याचे भूमी अभिलेख कार्यालयाचे अधीक्षक प्रताप चौधरी हे उपस्थित होते तर या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व कार्यालयाची कर्मचारी अधिकारी उपस्थित होते या कार्यक्रमात पूर्णा तालुक्यातील उपाधीक्षक कार्यालयातील कर्मचारी अनिल शिरडकर व नागेश गुरले या दोन कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचा जिल्हा अधीक्षक प्रताप चौधरी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आले याबद्दल त्यांचे पूर्णा येथील भूमि अभिलेख उपअधीक्षक भाऊराव बहिराम यांनी अभिनंदन केले आहे.

## बँक खात्यामध्ये पैसा असूनही मिळेना! सर्वच बँकांमध्ये कॅशचा तुटवडा

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** शहरातील सर्वच बँकांमध्ये पैशाचा तुटवडा झाल्यामुळे पैसे उचलण्यासाठी बँकांमध्ये आलेल्या नागरिकांना पैसे मिळत नसल्याने निराश होऊन वापस परतावे लागत आहे. त्यामुळे खात्यावर पैसा असूनही मिळत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.
सोनपेठ शहरातील प्रमुख असलेल्या भारतीय स्टेट बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व इतर खाजगी बँका आणि पतसंस्थांमध्ये पैशाचा मोठा तुटवडा झाला आहे. पैशाच्या तुटवड्यामुळे तालुक्यातील नागरिकांचे आर्थिक हाल होताना दिसत आहेत. सध्या पिएम किसान, निराधार, श्रावणबाळ,अपंग या लाभार्थ्यांचे अनुदान बँकांमध्ये जमा झाले आहे परंतू पैशाच्या तुटवड्यामुळे ते पैसा हातामध्ये मिळत नाही.तसेच रोहयो मजूरांचा रोजगार, विविध शासकीय योजनांचे अनुदान खात्यामध्ये जमा असूनही पैसा दिला जात नाही.शेतकऱ्यांचा शेतीमाल बाजारामध्ये नेऊन त्याची विक्री सुरू आहे. त्यामध्ये कापूस, सोयाबीन, ऊस, तुर, गहू, ज्वारी, बाजरी आदी शेतीमालाची खरेदी विक्री सर्वत्र सुरू आहे. त्यातच व्यापारी व कारखानदार शेतकऱ्यांच्या खात्यावर ऑनलाईन रक्कम पाठवत आहेत. सदरील रक्कम उचलण्यासाठी बहुतांश सामान्य नागरिक व शेतकऱ्यांकडे फोन पे, गुगल पे किंवा कुठलीही ऑनलाईन पैसे पाठविण्याचे साधन उपलब्ध नसते. त्यामुळे अशा लोकांना पैशाचा देवाण घेवाणीचा व्यवहार करणे जिकरीचे झाले आहे. तर त्यांच्या शेतीमालाच्या हक्काचे पैसेही बँकातून मिळत नसल्यामुळे शेतकरी हातबल झाला आहेत. शेती उत्पन्न काढण्या अगोदर शेतकऱ्यांनी उधारीवर खत, औषधी, बी बियाणे आधी आणलेले असते आणि ते उत्पादन झाल्यास शेतीमाल विकल्यानंतर उधारीचे पैसे परत केले जात असतात, परंतु यावेळी शेतीमालाचे पैसे आपल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा असूनही शेतकऱ्यांना मिळत नाहीत. दररोज शहरातील सर्वच बँकांमध्ये शेतकऱ्यांबरोबर व्यापारी व सर्वसामान्य नागरिक, पगारदार आपल्या खात्यावरील पैसे काढण्यासाठी बँकेमध्ये खेटे मारताना दिसत आहेत. सर्वच बँकेमध्ये गेल्यानंतर कॅश उपलब्ध नाही असे सांगितले जाते. त्यामुळे हातास होऊन नागरिकांना बँकेतून रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. एकंदरीत खात्यात पैसा असूनही खिशात येत नसल्यामुळे सामान्य नागरिकासह बँक खातेदारांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. अखेर हा सर्व पैसा दडलाय कुठे? हा एक संशोधनाचा विषय ठरला असून पैशाच्या तुटवड्याबद्दल ठीक ठिकाणी तर्क वितर्कच्या चर्चेला उधाण आले आहे.
बँकेत कॅश उपलब्ध नसल्यामुळे सर्वच बँकांचे एटीएम बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे आता एटीएम मधूनही पैसे मिळणे मुश्किल होऊन बसले आहे. पैसे काढण्यासाठी अनेक नागरिक बाहेरील ग्राहक सेवा केंद्रावर प्रति हजार रुपयांसाठी दहा रुपये देऊन खात्यावरली रक्कम काढण्यासाठी वणवण फिरताना दिसून येत आहेत. त्यामुळे पैशाच्या तुटवड्यामुळे सोनपेठ तालुक्यातील नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## जेष्ठ,दिव्यांगाना स्मार्ट कार्ड शिवाय सवलत सुरू: व्यवस्थापक चव्हाण



**जिंतूर,/प्रतिनिधी-** प्रवासादरम्यान ६५ वर्षे व ७५ वर्षांवरील जेष्ठ प्रवाश्या सह व दिव्यांग प्रवाशांना सुद्धा स्मार्ट कार्ड नसेल तर सवलत मिळणार नाही ही निव्वळ अफवा पसरली असून यावर विश्वास ठेवू नये असे आव्हान आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी केले आहे.

आगार व्यवस्थापक यांनी असेही स्पष्ट केले की महाराष्ट्र एसटी महामंडळा तर्फे ६५ व ७५ वर्षांवरील जेष्ठ प्रवाशांना तसेच दिव्यांग प्रवाशांना शासनाने जाहीर केल्या प्रमाणे सवलतीच्या दरात प्रवासाची सवलत दिलेली आहे.या जाहीर केलेल्या योजनेअंतर्गत सध्या राज्यभर मोठ्या तत्परतेने स्मार्ट कार्ड वितरण प्रक्रिया सध्या सुरू आहे.पण ज्येष्ठ तथा दिव्यांग प्रवासी वर्गाने प्रवासा दरम्यान स्मार्ट कार्ड असेल तरच सवलतीचा प्रवास भोगता येईल अशी चुकीची भावना मनात ठेवलेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आगार प्रमुख आनंद चव्हाण यांनी असे स्पष्ट केले की त्या प्रवाशाकडे सध्या स्मार्ट कार्ड उपलब्ध नाहीत अशा सर्व पात्र उर्वशी बांधवांना जीमानुसार सवलतीच्या लाखप्रसादरम्यान दिला जाणार आहे.

तो कुठेही स्मार्ट कार्ड बाबत थांबलेला नाही. सवलतीची प्रक्रिया पारदर्शक पने राबवण्यात येत असून पात्र प्रवाशांनी लवकरात लवकर स्मार्ट कार्ड काढून घ्यावे असेही शेवटी त्यांनी आवाहन केले आहे

### शेती कर्जाच्या विवंचनेतून महिलेची विहिरीत उडी; साखरेवाडी शिवारातील घटना

**मानवत /प्रतिनिधी -** शेती कर्जाच्या तणावातून एका महिलेने शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मानवत तालुक्यातील साखरेवाडी शिवारात घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.
पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सीमा मधुकर साबळे (वय ४७, रा. साखरेवाडी, ता. मानवत) असे मृत महिलेचे नाव आहे. त्यांच्या पती संतोष मधुकर साबळे यांनी याबाबत मानवत पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. दि. १५ एप्रिल रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास साखरेवाडी शिवारातील शेतातील विहिरीत त्यांनी उडी घेतली. प्राथमिक माहितीनुसार, शेतीचे कर्ज कसे फेडायचे या चिंतेतून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक ताण पुन्हा एकदा समोर आला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

### मानवत रोड रेल्वे स्थानकाजवळ सिग्नल बिघडवून एक्सप्रेसमध्ये दरोडा

शस्त्रांचा धाक दाखवत प्रवाशांकडून ऐवज लंपास

**परभणी,/प्रतिनिधी :** रेल्वे सिग्नल यंत्रणेत छेडछाड करून एक्सप्रेस गाडी थांबवून प्रवाशांची लूट केल्याची गंभीर घटना मानवत रोड रेल्वे स्थानकाजवळ उघडकीस आली आहे. गुरुवार १६ एप्रिलच्या पहाटे सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला.

गाडी क्रमांक १७०२६ काकीनाडा-साईनगर एक्सप्रेस मानवत रोड स्थानकाच्या दिशेने येत असताना सिग्नल न मिळाल्याने ती पुलाजवळ थांबली. याच वेळी काही अज्ञात दरोडेखोरांनी गाडीत प्रवेश करून प्रवाशांना चाकू व तलवारीचा धाक दाखवत लूटमार केली. विशेषतः जनरल व एस-४ डब्यातील प्रवाशांना लक्ष्य करण्यात आले. या घटनेत महिला प्रवाशांच्या अंगावरील दागिने तसेच इतर मौल्यवान वस्तू हिसकावून नेण्यात आल्या. सुमारे सहा जणांच्या टोळीने हा दरोडा टाकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बलाचे जवान घटनास्थळी पोहोचले. त्यांनी चोरट्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. त्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी सिग्नल यंत्रणेतील बिघाड दूर करून वाहतूक सुरळीत केली. या घटनेमुळे संबंधित एक्सप्रेस गाडी सुमारे चाळीस मिनिटे उशिराने मानवत रोड स्थानकात दाखल झाली. या प्रकरणी रेल्वे पोलीसांकडून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास करण्यात येत आहे.

## येलदरी कॅम्पमध्ये मारहाणीतील जखमीचा मृत्यू; किरकोळ वादातून घडली घटना : तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

**जिंतूर ,/प्रतिनिधी:** येलदरी कॅम्पमध्ये मारहाणीतील जखमीचा मृत्यू; किरकोळ वादातून घडली घटना : तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील येलदरी कॅम्प येथे किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अरविंद उर्फ आरुण नारायण रणखांब (वय ४५, रा. येलदरी कॅम्प, ता. जिंतूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेप्रकरणी त्यांची मुलगी स्नेहा अरविंद रणखांब (वय १९) हिने फिर्याद दिली आहे. त्यानुसार ९ एप्रिल रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घरासमोर ही घटना घडली. आरोपी रुपेश उर्फ अजय अशोक वाकळे, दिपक वाके व हैदर पठाण (सर्व रा. येलदरी कॅम्प) यांनी संगनमत करून अरविंद रणखांब यांच्यावर हल्ला केला. दारू पिण्यासाठी ५० रुपये मागितल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. यावेळी आरोपी रुपेश वाकळे याने लोखंडी रॉडने डोक्यावर व तोंडावर वार करून गंभीर जखमी केले, तर इतर दोघांनी लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

जखमी अवस्थेत असलेल्या रणखांब यांना आरोपींनीच जिंतूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करून अपघात झाल्याची खोटी माहिती दिली. मात्र उपचारादरम्यान १५ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी दखलपात्र क्र. २१५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ११५(२), ३(५) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस अधीक्षक बेनीवाल करत आहेत.

**मदत करणाऱ्यांनाही सहआरोपी केल्याने संताप...**
**येलदरी कॅम्प येथे ९ एप्रिल रोजी झालेल्या या घटनेत गंभीर जखमी रणखांब यांना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जाणाऱ्यांना सहआरोपी करून अटक करण्यात आल्याची माहिती मिळताच गावात संतापाची भावना व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्षा यांचे पती विजय वाकळे, सरपंच पिंटू चव्हाण यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी रात्री उशिरापर्यंत जिंतूर पोलीस ठाण्यात गर्दी केली. यावेळी सरपंच पिंटू चव्हाण यांनी, मदत करणाऱ्यांना सहआरोपी करणे चुकीचे असून यामुळे भविष्यात कोणीही माणुसकीच्या भावनेतून मदत करणार नाही. पोलीसांनी सखोल चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी केली.**

## अग्रलेख...

# या लढाईचे आव्हान!

केवळ मानवजातीच्याच नव्हे, तर एकूणच सर्व जीवसृष्टीच्या अस्तित्वास सर्वाधिक कडवे आव्हान कोण देतो, याची तीव्र स्पर्धा सध्या माणूस आणि निसर्ग यांच्यात सुरू आहे. अमेरिका-इस्रायल-इराणदरम्यानच्या भीषण युद्धसंघर्षामुळे जवळपास संपूर्ण जग ऊर्जा संकटाशी सामना करू लागले आहे. ही स्थिती निसर्गाने आणलेली नाही. काही मानवनिर्मित संकटे निसर्गाहून क्रूरपणे अस्तित्वावर कसा हल्ला करतात, याचा सध्याची युद्धस्थिती हा चालताबोलता पुरावा आहे. अशा संकटातून बाहेर पडण्याचे मार्ग केव्हा खुले होतील, याची आजच्या घडीला कोणतीही खात्री नाही. युद्धकाळामुळे उभ्या ठाकलेल्या संकटातून सावरण्यासारखी परिस्थिती सुरू होईल, तेव्हा निसर्गाचे संकट सुरू होईल आणि ती दुसरी लढाईच असेल, याची जाणीव आता गडद होऊ लागली आहे. हवामान बदल हे गेल्या काही दशकांतील सर्वात मोठे नैसर्गिक संकट मानले जाते. त्याचे तडाखे मानवजातीलाच नव्हे, तर सर्वच सजीवांना बसतात. जगणे होरपळून टाकणारा हा अनुभव गेल्या काही दशकांत वारंवार मिळत असल्याने, वातावरणातील बदलाचे संकट कायमचेच सजीवांच्या मानगुटीवर बसले आहे. आता तेच संकट नव्या आक्रमणासाठी सज्ज झाले आहे.

सलग काही वर्षे सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहील, अशी शक्यता अलिकडेच हवामान खात्याने व्यक्त केली आणि या संकटाचे संकेत सुरू झाले. भारतात वर्षभरात पडणाऱ्या पावसापैकी सुमारे ७० टक्के पाऊस केवळ जून ते सप्टेंबर या जेमतेम चार महिन्यांच्या कालावधीतच पडत असतो. यंदा या काळातील पाऊस दीर्घकालीन, म्हणजे गेल्या सुमारे ५० वर्षांतील जून ते सप्टेंबरमधील पावसाच्या सरासरीच्या ९२ टक्के इतका राहण्याची शक्यता आहे. म्हणजे गेल्या ५० वर्षांतील कमी पावसाची नोंद यंदाच्या मान्सूनच्या मोसमात होण्याची शक्यता आहे. पावसाच्या सरासरीतील ही तूट सुमारे ८ टक्के असेल. जेव्हा सरासरीहून अधिक पाऊस पडतो, तेव्हा माजणाऱ्या हाहाकाराचा अनुभव अलिकडेच आपण घेतला होता. २०२४ आणि २०२५ या दोन्ही वर्षांतील मान्सूनच्या मोसमात पावसाच्या सरासरीमध्ये ८ टक्क्यांची वाढ झाली, तेव्हा मोठ्या प्रमाणावर पूरस्थिती निर्माण झाली; मालमत्ता, पायाभूत सुविधा यांचे नुकसान तसेच जीवितहानी झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदाचा पावसाच्या सरासरीत ८ टक्क्यांची तूट झाली तर २०१९ नंतरचा हा सर्वात कमकुवत मान्सून ठरेल आणि खरीप हंगामातील तांदूळ, मका, ऊस, कडधान्ये, तेलबियांसारख्या पिकांवर संकटाचे सावट दिसेल. साधारणतः मे अखेर किंवा जूनच्या सुरुवातीस या पिकांची पेरणी सुरू होते. ऑक्टोबरच्या दरम्यान ती हाताशी येतात. आजही देशातील जवळपास ४५ टक्के शेती क्षेत्र सिंचनाच्या सुविधांपासून दूरच असल्याने मान्सूनचा पाऊस हाच शेतकऱ्यांचा हमखास आधार असतो. यंदा पावसाळ्याच्या उत्तरार्धात 'अल निनो' या हवामानविषयक घडामोडीचा प्रभाव मान्सूनच्या पावसातील तुटीस कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची कणा मानली जाणारी शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनच्या लहरीपणाचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो देशाच्या अर्थव्यवस्थेवर, महागाईवर आणि सामाजिक स्थैर्यावरही उमटतो. कारण यातूनच दुष्काळ, उष्णतेच्या लाटा व जलसंकट यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. उष्णतेच्या लाटांनी तर आताच विक्रमी उंची गाठण्यास सुरुवात केली असून महाराष्ट्रातील सुमारे १५ जिल्हे या संकटात होरपळणार असल्याचा इशारा जारी झाला आहे. उष्माघाताने एकएक बळी घेण्यास सुरुवात केली आहे. येत्या महिनाभरात उष्णतेच्या लाटा आपले तडाखे तीव्र करतील, असे इशारे जारी झाले आहेत. राज्यात उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाने उष्णतेपासून बचाव करण्यासाठी व्यापक मानक कार्यपद्धती जारी केल्या आहेत. कामगार, खाण कामगार आणि घाम गाळून काम करणाऱ्या श्रमिक वर्गास अशा संकटांचे चटके सर्वाधिक बसतात. त्यामुळे नैसर्गिक संकटे हे सातत्यपूर्ण आव्हान ठरले आहे. विशेषतः उत्तर व मध्य भारतात उष्माघातामुळे मृत्यूंची संख्या वाढल्याचे अनेकदा दिसून आले आहे. पाण्याची टंचाई, वीज मागणीतील वाढ आणि आरोग्यविषयक समस्या या सर्व गोष्टी एकाच वेळी तीव्र होतात. पर्यायी साधनसंपत्तीच्या अभावामुळे ग्रामीण भागात तर परिस्थिती अधिकच गंभीर बनते. २०१५ मध्ये 'अल निनो'मुळे भारतातील पावसाची सरासरी १४ टक्क्यांनी घटली, तेव्हा अन्नधान्य उत्पादनात २.३ टक्क्यांची घट झाली होती. यंदा पावसाचे प्रमाण घटल्यास शेतीसमोर आव्हान उभे राहीलच; पण पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाची त्यामध्ये भर पडलेली असेल. नैसर्गिक वायू व खतांच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. नैसर्गिक वायूपासून नायट्रोजनयुक्त खतांची निर्मिती केली जाते. सध्या देशात तांदूळ आणि गव्हाचा साठा समाधानकारक असला, पावसाने पाठ फिरविल्यास अन्नधान्य, कडधान्य आणि तेलबियांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. पावसाची कमतरता हा केवळ शेतीलाच शाप ठरतो असे नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि वीजनिर्मितीला फटका हे या संकटाचे 'साईड इफेक्टस्' असतात. अल निनो ही प्रशांत महासागरातील पाण्याच्या तापमानवाढीशी संबंधित नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु तिचे परिणाम स्थानिक पातळीपुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावर जाणवतात. भारतात अल निनोमुळे मान्सूनचा पाऊस दडी मारतो, हा इतिहासच आहे. याआधी १९७२, १९८७, २००२ आणि २००९ ही वर्षे भारतातील दुष्काळासाठी कुप्रसिद्ध ठरली. या काळातही मान्सूनच्या हंगामावर अल निनोचा प्रभाव होता. २००२ मधील दुष्काळाने देशातील अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम केला आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावला. गेल्या वर्षभरात जगभराने 'अल निनो'च्या प्रभावाचे मोठे फटके अनुभवले. २०२५ मध्ये पृथ्वीवरील हिमनद्या मोठ्या प्रमाणावर वितळल्या. एका जागतिक अहवालानुसार, गेल्या वर्षात सुमारे ४०० अब्ज टन बर्फ वितळले आणि जागतिक समुद्रपातळीत १.१ मिलीमीटरने वाढ झाली. संपूर्ण वर्षभरात प्रत्येक सेकंदाला ऑलिम्पिक आकाराच्या पाच जलतरण तलावांइतका बर्फ नष्ट होत असल्यासारखी ही स्थिती आहे, हा या अहवालातील इशारा संकटाचे गांभीर्य अधोरेखित करण्यासाठी पुरेसा आहे. कॅनडाचा पश्चिम भाग, अमेरिका आणि मध्य युरोपात बर्फ वितळण्याचे हे प्रमाण सर्वाधिक असल्याने या प्रदेशांतील सुमारे दोन अब्ज लोकांच्या जलसुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला असून बर्फ वितळण्याचा वेग झपाट्याने वाढत असल्याचे निष्पन्न झाले आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात दरवर्षी १०० अब्ज टनांपेक्षा कमी बर्फ वितळत असे; आता हा आकडा ४०० अब्ज टनांहून अधिक झाला आहे.

एकूणच, निसर्गनिर्मित संकटे आणि मानवनिर्मित संकटे यांच्या कचाट्यात सापडलेल्या यच्चयावत सजीव समुदायांस आता अनिश्चिततेशी जुळवून घ्यावे लागणार, हे स्पष्ट झालेले आहे. सरकारनेही गेल्या काही वर्षांत या दिशेने काही पावले उचलली आहेत. पण केवळ सरकारी उपाययोजनांवर विसंबून या संकटाचा सामना करणे शक्य नाही. काही जबाबदाऱ्या समाजासही उचलाव्या लागतील. पाण्याचा कार्यक्षम वापर, शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे बळ देणारे शेतीपूरक उद्योग, स्थानिक पातळीवर जलसंधारण उपक्रम यांवर भर द्यावा लागेल. हवामानातील बदलांना सामोरे जाणे ही केवळ सरकारची जबाबदारी असणार नाही, तर ती सामूहिक प्रयत्नांची कसोटी ठरणार आहे. अल निनोकडे आता केवळ नैसर्गिक घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. शेती, अर्थव्यवस्था आणि समाज या तिन्ही स्तरांवर परिणाम करणारे ते एक व्यापक आव्हान आहे. एका परीने मानवनिर्मित संकटापाठोपाठ सुरू होणारे हे दुसऱ्या लढाईचे आव्हान असणार आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी दूरदृष्टी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि ठोस धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. अन्यथा, प्रत्येक वर्ष नव्या संकटांची मालिका घेऊन येत राहील.

## अर्थविशेष

हितेश पारसे

# ज्येष्ठ नागरिकांनी आयकर रिटर्न भरायलाच हवे का?

भारतात वाढत्या आयुर्मानामुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे आणि निवृत्तीनंतरचे जीवन आर्थिकदृष्ट्या सुरक्षित व सुसंगत ठेवणे ही प्रत्येकासाठी अत्यंत महत्त्वाची बाब बनली आहे. बहुतांश ज्येष्ठ नागरिक पेन्शन, बँक व्याज, मुदत ठेवी, भाडे किंवा लहान गुंतवणुकीतून उत्पन्न मिळवत असतात. या पृष्ठभूमीवर 'आयकर रिटर्न भरावा लागतो का?' हा प्रश्न वारंवार विचारला जातो. अनेक वेळा 'उत्पन्न कमी आहे' किंवा 'निवृत्त आहोत' या कारणांमुळे विवरणपत्र भरले जात नाही. मात्र हा दृष्टिकोन चुकीचा ठरू शकतो.

आयकर कायद्यानुसार, ६० वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीला 'ज्येष्ठ नागरिक' आणि ८० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तीला 'अतिज्येष्ठ नागरिक' मानले जाते. या वर्गीकरणानुसार करमुक्त मर्यादित सवलती दिल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी ३,००,००० आणि अतिज्येष्ठ नागरिकांसाठी ५,००,००० पर्यंतचे उत्पन्न करमुक्त असते. तथापि, ही मर्यादा ओलांडल्यास विवरणपत्र भरणे बंधनकारक ठरते. परंतु, केवळ उत्पन्नाच्या मर्यादेवरून निर्णय घेणे योग्य नाही. बँक एफडी किंवा बचत खात्यावरील व्याजावर अनेक वेळा टीडीएस कपात केला जातो. अशा वेळी, जरी उत्पन्न करमुक्त मर्यादेपेक्षा कमी असले, तरी तो टीडीएस परत मिळविण्यासाठी विवरणपत्र भरणे आवश्यक असते. अन्यथा, ती रक्कम सरकारकडेच राहते. डिजिटल युगात आयकर विभागाकडे एआयएस (अन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट) आणि टीआयएस (टॅक्सपेयर इन्फॉर्मेशन समरी) च्या माध्यमातून सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. मोठे व्यवहार, मालमत्ता खरेदी-विक्री, बँक व्यवहार, गुंतवणूक यांची माहिती विभागाकडे आधीपासून असते. त्यामुळे विवरणपत्र न भरल्यास नोटीस येण्याची शक्यता वाढते. सेक्शन १९४पी अंतर्गत सरकारने ७५ वर्षांवरील काही ज्येष्ठ नागरिकांना सवलत दिली आहे. ज्यांचे उत्पन्न फक्त पेन्शन आणि त्याच बँकेतून मिळणाऱ्या व्याजापुरते मर्यादित आहे आणि ज्यांनी फॉर्म १२बीबीए सादर केले आहे, अशा व्यक्तींना विवरणपत्र भरण्याची गरज राहत नाही. मात्र, ही सवलत मर्यादित असून इतर उत्पन्न असल्यास लागू होत नाही. पेन्शन ही 'सॅलरी इन्कम' म्हणून गणली जाते आणि त्यावर ५०,०००/७५,००० स्टँडर्ड डिडक्शन मिळते. दुसरीकडे, बँक व्याज 'इन्कम फ्रॉम अदर सोर्स'मध्ये येते आणि सेक्शन ८० टीटीबी अंतर्गत ५०,००० रुपयांपर्यंत सूट मिळते. योग्य नियोजन केल्यास कराचा भार कमी करता येतो.

**ज्येष्ठ नागरिकांची व्याख्या** : ज्येष्ठ नागरिक ६० ते ८० वर्षे, अतिज्येष्ठ नागरिक ८० वर्षांपेक्षा जास्त

**करमुक्त मर्यादा** : वर्ग करमुक्त उत्पन्न मर्यादा : सामान्य व्यक्ती २,५०,०००, ज्येष्ठ नागरिक ३,००,०००, अतिज्येष्ठ नागरिक ५,००,०००

**आयकर विवरणपत्र कधी भरावे?** : खालील परिस्थितीत आयकर विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे - (१) उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त असल्यास- उदा. ३,००,००० किंवा ५,००,००० पेक्षा जास्त. (२) ठरावीक आर्थिक व्यवहार झाल्यास- १ कोटीपेक्षा जास्त चालू खात्यात जमा. ५० लाखांपेक्षा जास्त बचत खात्यात जमा, २ लाखांपेक्षा जास्त परदेश प्रवास खर्च, १ लाखापेक्षा जास्त वीज बिल, ४. विवरणपत्र न भरल्यास धोके. सर्व व्यवहारांची माहिती शासनाकडे उपलब्ध असते, तफावत आढळल्यास नोटीस येऊ शकते, परतावा मिळत नाही, दंड लागू शकतो (१,००० ते ५,०००), ५. स्रोतावर कर कपात (टीडीएस) असल्यास. बँक ठेवीवरील व्याजावर अनेकदा कर कपात होते, उत्पन्न करमुक्त असले तरी कपात झालेला कर परत मिळविण्यासाठी विवरणपत्र भरणे आवश्यक, ६. विशेष सवलत (७५ वर्षांवरील)



**खालील अटी पूर्ण असल्यास विवरणपत्र भरण्याची गरज नाही** : वय ७५ वर्षांपेक्षा जास्त. फक्त निवृत्तिवेतन आणि त्याच बँकेतील व्याज उत्पन्न. संबंधित घोषणापत्र सादर केलेले. बँक स्वतः कराची गणना करून कपात करते.

**उत्पन्नाचे प्रकार व सूट-** (१) निवृत्तिवेतन - ५०,००० पर्यंत निश्चित कपात. (ब) व्याज उत्पन्न - ५०,००० पर्यंत सूट. (क) इतर सूट. गुंतवणूक (१.५ लाख पर्यंत). आरोग्य विमा (५०,००० पर्यंत).

**प्रत्यक्ष उदाहरणे** : १ : विवरणपत्र बंधनकारक नाही. श्री. देशमुख (वय ६५ वर्षे) निवृत्तिवेतन = २,४०,००० रुपये, व्याज = ४०,००० रुपये, एकूण = २,८०,००० रुपये. कर - नाही. विवरणपत्र - ऐच्छिक. २ : परताव्यासाठी आवश्यक- श्रीमती जोशी (वय ६२ वर्षे) - ठेवीवरील व्याज = २,८०,००० रुपये. कर कपात = २८,००० रुपये. कर देयक शून्य. २८,००० परत मिळविण्यासाठी विवरणपत्र आवश्यक. ३ : कर लागू होतो. श्री. कुलकर्णी (वय ६७ वर्षे). निवृत्तिवेतन = ४,००,००० रुपये. व्याज = १,००,००० रुपये, एकूण = ५,००,००० रुपये,, वजावट : ५०,००० (निश्चित कपात)- ५०,००० (व्याज सूट). करपात्र उत्पन्न = ४,००,००० रुपये, विवरणपत्र बंधनकारक. ४ : विशेष सवलत लागू - श्री. पाटील (वय ७८ वर्षे)- निवृत्तिवेतन = ५,००,००० रुपये, व्याज = २,००,००० रुपये, बँकेत घोषणा दिलेली विवरणपत्र भरण्याची गरज नाही

**सामान्य चुका** : आवश्यक घोषणा न देणे - उपलब्ध सूट न घेणे - व्यवहारांची पडताळणी न करणे - संयुक्त ठेवीत उत्पन्न चुकीने दाखवणे

**विवरणपत्राचे फायदे** : कर्जासाठी आवश्यक - परदेश प्रवासासाठी उपयोगी - उत्पन्नाचा अधिकृत पुरावा - आर्थिक विश्वासार्हता वाढते

**कोणता फॉर्म वापरावा?** : परिस्थिती फॉर्म. निवृत्तिवेतन + व्याज फॉर्म क्रमांक १. भाडे/भांडवली नफा फॉर्म क्रमांक २. व्यवसाय उत्पन्न फॉर्म क्रमांक ३. अनेक ज्येष्ठ नागरिक फॉर्म १५एच भरत नाहीत, डिडक्शन घेत नाहीत किंवा एआयएस तपासत नाहीत. या चुका टाळण्यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास कर नियोजन प्रभावी करता येते.

**कलम ८७अ अंतर्गत कर सवलत**

जर एखाद्या ज्येष्ठ नागरिकाचे एकूण करपात्र उत्पन्न रु. ५,००,००० पर्यंत असेल (जुनी कर पद्धती), तर कलम ८७अ अंतर्गत त्यांना जास्तीत जास्त १२,५०० पर्यंत कर सवलत मिळते. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रत्यक्ष कर देयक शून्य होते. तसेच, नवीन कर पद्धतीनुसार जर करपात्र उत्पन्न १२,००,००० पर्यंत असेल, तर कलम ८७अ अंतर्गत ६०,००० पर्यंत कर सवलत मिळते, ज्यामुळे प्रत्यक्ष कर देयक शून्य होऊ शकते. मात्र, ही सवलत मिळविण्यासाठी आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक आहे.

**निष्कर्षत**: सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी विवरणपत्र भरणे बंधनकारक नसले, तरी अनेक परिस्थितींमध्ये ते आवश्यक आणि फायदेशीर ठरते. जसे की, उत्पन्न मर्यादा ओलांडल्यास, कर परतावा घ्यायचा असल्यास, भाडे/नफा असल्यास, योग्य माहिती, जागरूकता आणि नियोजन यामुळे आर्थिक लाभ मिळू शकतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# फ्री डिलिव्हरीचा 'गोड गुंता!'

सध्याच्या काळात 'क्विक कॉमर्स' नावाची एक भयंकर सोय आपल्या सेवेत हजर आहे. भयंकर यासाठी की, ही सेवा नकळत आपल्या निर्णयक्षमतेला प्रभावित करू लागली आहे. एका क्लिकवर दूध-दह्यापासून गहू-तांदळापर्यंत, चपला-जोड्यांपासून औषधांपर्यंत प्रत्येक वस्तू काही मिनिटात दारात हजर होते. ही अतिशय आधुनिक आणि परिपूर्ण सुविधा आता घरातील प्रत्येकाच्या हातातील मोबाईलमध्ये आपल्या सेवेसाठी सज्ज आहे. इतकी 'सज्ज' की ती स्वतःच्या अस्तित्वाची आठवण सतत करून देते. अलाउद्दीनच्या दिव्यासारखी ही सुविधा मूलभूत गरज बनली आहे. मग त्या वस्तूंची खरंच गरज असो किंवा नसो, वस्तू दारात येऊन तयारच!

ऑनलाईन शॉपिंग म्हणजे आधीच एक व्यसन आणि त्यात अमुक एका रकमेची खरेदी करा आणि फ्री डिलिव्हरी मिळवा, अशी लक्षवेधी गळ घातली गेल्यानंतर, सामान्य माणूस सहज त्या 'गळाला' लागतो. खरे तर तातडीने गरज असते, एक लिटर दुधाची! साधारण ५० रुपयाचे दुधाचे पाकीट डिलिव्हरी चार्जेससोबत ८० रुपयांचे होताना बघून आपला जीव दडपतो. त्याच क्षणी मेसेज येतो, 'काही विसरलात का?' मग, दही, बटर, चीझ, ताक असे पर्याय येतात आणि सोबत 'फक्त २५ रुपयांची खरेदी करून मिळवा फ्री डिलिव्हरी!' हा मेसेजही येतो. ही चांगली ऑफर आहे, असे म्हणून आपण एक पाकीट बटर आपल्या ऑनलाईन कार्टमध्ये अॅड करतो. त्याच क्षणी आपण फ्री डिलिव्हरीपासून फक्त २० रुपये दूर असल्याचे सांगणारा मेसेज येतो आणि ब्रेड, ब्राऊन ब्रेड, पावाचे अनेक प्रकार पुढ्यात येतात. 'अरे हो! बटरसोबत ब्रेड हवीच' या बाळबोध विचाराने एक ब्रेडचं पाकीट आपण अॅड करतो. तोपर्यंत, १० रुपयांच्या आईसकँडीज्, कोल्डड्रिंक अशी जंत्री पुढ्यात हजर होते. १०-२० रुपयांची आणखी खरेदी करून, पेमेंट करून आपण मोकळे होतो. म्हणजे ५० रुपयांच्या दुधाच्या पाकिटापासून सुरू झालेली खरेदी दीडशे रुपयांपर्यंत संपते. नकळत आपण 'क्विक कॉमर्स'च्या जाळ्यात अलगद अडकलेले असतो. कोणत्याही ऑर्डरची किमान किंमत हा विचार करण्याचा विषय आहे. ५० रुपयांच्या वस्तूचीच गरज असताना, केवळ डिलिव्हरी शुल्क द्यावे लागू नये म्हणून आपण २०० रुपयांची खरेदी करून टाकतो. खर्च वाढत जातो, ठळक दिसेल असा नाही तर गुपचूप! क्विक कॉमर्सच्या जगात आपल्या या वागणुकीचा अभ्यास करणारी यंत्रणा अखंड काम करते आहे. 'बिहेव्हियरल इकॉनॉमिस्ट्स' या प्रक्रियेला 'फ्रिक्शनलेस स्पेंडिंग' असं म्हणतात. जेव्हा पैसे देण्याची प्रक्रिया इतकी सोपी असते तेव्हा अगदी सहज आपलं त्याकडे लक्षही जात नाही. यात दुसरा प्रकार क्रेविंगजचा आहे. रात्री-अवेळी काहीतरी खायची इच्छा होणं, म्हणजे 'क्रेविंग'. अशा स्थितीत दोन पर्याय असतात. त्या क्षणी संयम बाळगून शांत राहणे म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत आपण विसरतो. दुसरा पर्याय मन कशाला मारायचं? या कॅटेगरीतील असतो. झटपट ऑर्डर करायची, दारात आलेल्या चीजवस्तूचा आनंद घ्यायचा आणि महत्त्वाचं म्हणजे बिनदिक्कत जास्तीचे पैसे खर्चायचे. 'मिनिमम कार्ट व्हॅल्यू'च्या या गोड आणि नकळत लादल्या जाणाऱ्या दबावतंत्रातून बाहेर यायला हवं. 'हे देखील घेऊनच टाकू या...' हा विचार अनावश्यक आणि जास्तीच्या वस्तू प्रत्येक फ्री डिलिव्हरीसोबत येतात. महिन्याच्या शेवटी इतके पैसे आपण कशावर खर्च केले, हेसुद्धा नंतर आपल्याला जाणवत नाही. थोडं थांबून, पुन्हा विचार करून निर्णय घ्यायला आपल्याला वेळ द्यायचा नाही, हे क्विक कॉमर्सचे मूळ सूत्र आहे. या विविध अॅपच्या माध्यमातून खरेदीचा नेमका फायदा घेणं, विविध ऑफर्सचे कूपन अप्लाय करणं आणि संयमित खरेदी करणं हे ग्राहक म्हणून आपलं कौशल्य आहे. खरेदीसाठी याद्या बनविणं, कोपऱ्यावरचा भाजीवाला किंवा वाण्याशी घरगुती संबंध असणं, त्यांच्याकडे उधारीची खाती चालविणं, दूध-ब्रेडसाठी थोडं चालत जाणं या सगळ्यांतून थोडे पैसे वाचविणे, संयमाची सवय, लोकांशी संवाद आणि 'डिजिटल डिटॉक्स' असे फायदे नक्कीच होतात.
हे अॅप बिनकामाचे आहेत किंवा क्विक कॉमर्स वाईट आहे, असे नाही. ती एक वेळ वाचविणारी सोय आहे. फक्त, त्याची सवय लागता कामा नये. या नियंत्रणामुळे जीवनात खूप आमूलाग्र बदल वगैरे होणार नाहीत, पण, आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी मात्र नक्कीच सुधारतील आणि माणसात आल्यासारखं वाटेल. १० मिनिटांच्या सोयीसाठी आपण काय गमावत आहोत, ते स्पष्ट होईल. खूपच आवश्यक असेल तेव्हाच दैनंदिन खरेदी या अॅप्सवरून करा. मनमौजी न होता संयमाची गुरुकिल्ली शोधा. ऑनलाईन नाही हो...तुमच्याचजवळ!

९८५०३३९२४०

## दखल

शिवाजी कराळे

# कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांची असुरक्षितता

नाशिकमधील 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' या नामांकित आयटी कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांवरील कथित लैंगिक अत्याचार आणि त्यानंतर धर्मांतरासाठी दबाव आणल्याच्या आरोपांनी कॉर्पोरेट जगताला अस्वस्थ करणारे प्रश्न समोर आणले आहेत. या प्रकरणाकडे एखाद दुसरी घटना असल्याप्रमाणे पाहता येणार नाही. कारण यात कार्यस्थळी सुरक्षितता, सत्तेचा गैरवापर, तक्रार निवारण यंत्रणेची विश्वासार्हता आणि संस्थात्मक जबाबदारी अशा अनेक बाबींचा समावेश होतो. देशातील सर्वात प्रतिष्ठित कंपन्यांपैकी एक असलेल्या संस्थेबाबत अशा प्रकारच्या तक्रारी समोर येतात, तेव्हा त्या संबंधित कंपनीपुरत्याच मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण कॉर्पोरेट संस्कृतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. या पृष्ठभूमीवर टाटा समूहाचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन यांनी दिलेली प्रतिक्रिया महत्त्वाची ठरते. त्यांच्या वक्तव्यात संस्थेची प्रतिमा जपण्याबरोबरच आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य चौकशी होईल, असा संकेत दिसून येतो; मात्र अशा प्रसंगी केवळ आश्वासन पुरेसे ठरत नाही, तर पारदर्शक आणि निष्पक्ष तपास होऊन सत्य बाहेर येणे अधिक आवश्यक असते.

सेक्शुअल हॅरेसमेंट ऑफ वुमेन अॅक्ट, २०१३ सारखा कायदा तसेच विशाखा मार्गदर्शक सूचना या ऐतिहासिक मार्गदर्शक तत्त्वांमुळे प्रत्येक संस्थेला कार्यस्थळी लैंगिक छळ रोखण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रत्येक मोठ्या कंपनीत अंतर्गत तक्रार समिती, प्रशिक्षण कार्यक्रम आणि संवेदनशीलता उपक्रम राबविले जातात. कागदोपत्री ही व्यवस्था सक्षम आणि सर्वसमावेशक वाटते; मात्र अशा घटनांची संख्या वाढत असून त्या दडपण्याचे प्रकार वाढत आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांनी लैंगिक छळाच्या तक्रारी केल्या, तर त्या संबंधित समित्यांकडे पाठवायला हव्यात. त्याची चौकशी व्हायला हवी. तथ्य आढळल्यास त्या पोलिसांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत; परंतु नाशिकचे प्रकरण पाहता 'टीसीएस'च्या पुण्यातील मनुष्यबळ विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिलांच्या तक्रारीची दखल घेतली नाही, असे दिसते. त्यामुळे या लैंगिक अत्याचारात त्यांना सहआरोपी केले, हे बरे झाले. प्रश्न असा आहे की, या सगळ्या चौकटी असूनही प्रत्यक्षात महिलांना सुरक्षिततेची हमी मिळते का? कॉर्पोरेट क्षेत्रात पद, सत्ता आणि संधी यांचा गुंतागुंतीचा खेळ सुरू असतो.

एखाद्या व्यक्तीवर त्याच्या इच्छेविरुद्ध धार्मिक ओळख बदलण्याचा दबाव आणला जात असेल, तर तो केवळ नैतिकतेच्या नव्हे, तर कायद्याच्या चौकटीतही गंभीर गुन्हा ठरतो; मात्र या मुद्याकडे पाहताना अत्यंत सावध दृष्टिकोन आवश्यक आहे. परिणामी प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र, पुराव्यांवर आधारित चौकशी होणे अत्यावश्यक आहे. व्यक्तींच्या कृत्यांना संपूर्ण समुदायाशी जोडणे टाळले पाहिजे. अन्यथा, न्यायाच्या प्रक्रियेवरच परिणाम होऊ शकतो. महिलांच्या सुरक्षिततेबाबत सर्वात मोठा प्रश्न केवळ नियमांचा नसून त्यांच्या अंमलबजावणीचा आहे. अनेक वेळा तक्रार समित्या अस्तित्वात असल्या तरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसतात. वरिष्ठ व्यवस्थापनाचा प्रभाव, संस्थेची प्रतिमा जपण्याची धडपड आणि अंतर्गत राजकारण यामुळे तक्रारी दडपल्या जाण्याची शक्यता निर्माण होते. पीडित महिलांना बदली, नोकरी जाण्याची भीती किंवा बदनामी यांचा सामना करावा लागतो. परिणामी, अनेक घटना कधीच समोर येत नाहीत. हीच शांतता शोषणाला खतपाणी घालते. यावर उपाय म्हणून केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर संस्थात्मक संस्कृतीत मूलभूत बदल आवश्यक आहेत. त्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि पीडित-केंद्रित दृष्टिकोन यांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. तक्रार करणाऱ्या महिलांना संरक्षण आणि मानसिक आधार देणे, चौकशी प्रक्रिया स्वतंत्र ठेवणे आणि दोषींवर कोणताही दबाव न आणता कठोर कारवाई करणे ही किमान अपेक्षा असावी. त्याचबरोबर पुरुष कर्मचाऱ्यांमध्येही संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे महत्त्वाचे आहे. कॉर्पोरेट क्षेत्र हे आधुनिकतेचे आणि प्रगतीचे प्रतीक मानले जाते; परंतु त्याच क्षेत्रात महिलांना सुरक्षिततेची हमी मिळत नसेल, तर ही प्रगती अपुरी आहे. पद आणि पैशाच्या मागे धावताना मानवी मूल्ये दुर्लक्षित होत असल्यास त्याची किंमत संपूर्ण समाजाला चुकवावी लागते. त्यामुळे महिलांच्या सन्मानाचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण हे केवळ कायद्याचे नव्हे, तर प्रत्येक संस्थेच्या नैतिकतेचे मोजमाप ठरले पाहिजे. नोकरी, बढती किंवा वेतनवाढ यांसारख्या बाबींचे आमिष दाखवून जर शोषण होत असेल, तर तो केवळ वैयक्तिक गैरवर्तनाचा मुद्दा राहत नाही, तर ते संस्थात्मक अपयश ठरते. अशा वातावरणात पीडित महिलांसाठी आवाज उठवणे अधिक कठीण होते. कारण त्यांच्या समोर करीअर, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचे प्रश्न उभे राहतात.

धर्मांतराच्या दबावासारख्या संवेदनशील आरोपांमुळे या प्रकरणाला आणखी एक गंभीर परिमाण मिळाले आहे. असे काही घडत असेल, तर ते कायद्याच्या चौकटीत तपासले जावे आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी; मात्र या मुद्यावर बोलताना व्यापक समाज किंवा विशिष्ट समुदायावर सरसकट आरोप करण्याऐवजी, संबंधित व्यक्तीच्या कृत्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अन्यथा, अशा प्रकरणांचा वापर समाजात दुरावा आणि अविश्वास वाढविण्यासाठी होऊ शकतो. या संपूर्ण घडामोडींनी कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता प्रत्यक्षात कितपत सुनिश्चित आहे, हा मूलभूत प्रश्न समोर आणला आहे. कायदे आणि धोरणे कागदावर असली, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, हे तपासायला हवे. तक्रारी ऐकून घेणारी यंत्रणा निष्क्रिय किंवा पक्षपाती असेल, तर पीडितांना न्याय मिळण्याची आशा क्षीण होते. अशा वेळी संस्थांनी केवळ नियमांचे पालन केल्याचा दिखावा न करता, प्रत्यक्षात सुरक्षित आणि न्याय्य वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहणे गरजेचे आहे. या प्रकरणाचे सत्य काय आहे, हे निष्पक्ष चौकशीतूनच स्पष्ट होईल; परंतु इतके मात्र नक्की की, अशा आरोपांनी कॉर्पोरेट भारताला आत्मपरीक्षण करण्याची संधी दिली आहे. प्रतिष्ठा, नफा आणि विस्तार यांच्याइतकीच महत्त्वाची बाब म्हणजे कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि सुरक्षितता. तीच धोक्यात आल्यास कोणतीही संस्था कितीही मोठी असली, तरी विश्वासार्हता टिकविणे कठीण ठरेल.

(लेखक विधिज्ञ आहेत.)

## जल संवर्धन काळाची गरज

पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. 'जल आहे तर जीवन आहे' हे वाक्य अगदी सत्य आहे. मानव, प्राणी, पक्षी, वनस्पती, शेती, उद्योगधंदे आणि संपूर्ण पर्यावरण यांचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. परंतु आज वाढती लोकसंख्या, पाण्याचा वाढता वापर, भूजलाची घटती पातळी, नद्यांचे प्रदूषण आणि जंगलतोड यामुळे पाण्याची टंचाई गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे जलसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. जलसंवर्धन म्हणजे पाण्याचे जतन करणे, योग्य वापर करणे, साठवण करणे आणि भविष्यासाठी सुरक्षित ठेवणे होय. निसर्गाने दिलेले पाणी मर्यादित आहे. त्याचा अपव्यय न करता नियोजनपूर्वक उपयोग केला पाहिजे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाते. जर ते योग्य प्रकारे साठवले तर भविष्यात पाण्याची आहेत. नद्यांमध्ये सांडपाणी आणि कचरा सोडल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. जंगलतोडी मुळे पावसाचे प्रमाण कमी होत आहे तसेच लोकसंख्या वाढीमुळे पाण्याची मागणीही वाढत आहे. जलसंवर्धनासाठी पावसाचे पाणी साठवणे हा उत्तम उपाय आहे. घरांच्या छतावरून येणारे पाणी टाक्यांमध्ये साठवून शेतीत ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा वापर केल्यास पाणी वाचते. शेतीत जलयुक्त शिवार हा मूलभूत उपाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. त्याचा उन्नत प्रभाव बघायला मिळाला. नळ चालू ठेवणे, पाणी वाया घालवणे या सवयी बदलल्या पाहिजेत. तलाव, विहिरी आणि बंधारे यांची दुरुस्ती करून त्यांचा उपयोग वाढवता येतो. जास्तीत जास्त वृक्षारोपण केल्यास पावसाचे प्रमाण वाढते आणि जमिनीत पाणी मुरते. विद्यार्थ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, झाडे लावावीत. इतरांना जागरूक करावे आणि शाळेत

## वाचक पत्रे

करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

**अनंत कपाळे** / ९३७३१०२८९८

### चांदणी चौकातील बस थांबा

सातान्याकडे अथवा स्वारगेटकडे जाताना सर्व बसेस चांदणी चौकात हायवेवर थांबतात. त्याठिकाणी उतरणाऱ्या प्रवाश्यांना बावधन अथवा कोथरूड येथे जायचे असते. प्रवासी सामानासह हायवेवर उतरल्यावर, मागून मळशीकडन पलावरून खाली भरधाव येणारी आणि उतरावे लागते किंवा बावधनच्या दिशेने मागे यावे लागते. माझी सूचना आहे की, मुळशीकडून येणाऱ्या पुलाखाली पुणे महानगर बस सेवेचा थांबा आहे. तिथेच म.रा.प. महामंडळाच्या साताऱ्याकडे जाणाऱ्या बसेस थांबवण्यात याव्या. कोथरूड मार्गे स्वारगेटला जाणाऱ्या बसेस, त्याच थांब्यालगत पण बावधन सेवा रस्त्यावर थांबवाव्या म्हणजे बावधनच्या प्रवाश्यांना सुरक्षितपणे उतरता येईल तसेच कोथरूडला जाऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांसाठी कोथरूडचा उतार संपल्यानंतर भुसारी कॉलनी येथे थांबा द्यावा.

**प्रसाद भट** / बावधन, पुणे-९४२३३२९०००

### ग्रामीण भाग आणि अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु अकरावी प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना आपली सर्व माहिती अद्यायावत करावी लागणार व दहावीचा निकाल लागल्यानंतर प्रवेश अर्जाचा भाग-२ ज्यावेळेस सुरू होईल त्यावेळी महाविद्यालयाचा पसंती क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी वापरावा लागेल; शिवाय कोणकोणती कागदपत्रे लागतात हाही विचार करावा लागेल. कॉलेजेसचे कटऑफ समजून घ्यावे लागतील. या सर्व ऑनलाईन प्रक्रियेतून जाताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. मागील वर्षी ऑनलाईन प्रक्रियेचे योग्य मार्गदर्शन नसल्याने त्यांचे प्रवेश त्यांच्या गावापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या महाविद्यालयात झाले. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शिक्षकांनी, पालकांनी, गावातील ऑनलाईन मार्गदर्शन केंद्रांनी लक्ष घालून त्यांची प्रवेश प्रक्रिया सकर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# आता फार्मर आयडीशिवाय खत नाही; ॲग्रीस्टॅक योजनेमुळे पारदर्शकता वाढणार

## भूम तालुक्यात ४४ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण...




**महावीर जालन**
**भूम, दि.१७ एप्रिल -**
तालुक्यातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानित रासायनिक खतांच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी तसेच लिंकिंग, गैरप्रकार आणि काळाबाजार रोखण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ थेट व योग्य पद्धतीने मिळणार आहे.

शासनाच्या या नव्या प्रणालीमुळे प्रत्येक शेतकऱ्याची डिजिटल ओळख निश्चित होणार असून खत वितरणाचा संपूर्ण मागोवा घेणे शक्य होणार आहे. यामुळे दुबार नोंदी, चुकीचा वापर आणि मध्यस्थांमार्फत होणाऱ्या फसवणुकीवर नियंत्रण येणार आहे. शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत क्षेत्र व पिकांच्या गरजेनुसारच खत वितरण करण्यात येणार असल्याने प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंतच अनुदान पोहोचेल.

अनुदानित खत खरेदीसाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात येणार असून खरेदीवेळी आयडी स्कॅन करून पडताळणी केली जाणार आहे. हा नियम टप्प्याटप्प्याने लागू करण्यात येणार असून लवकरच सर्व खत वितरण केंद्रांवर सक्ती होण्याची शक्यता आहे.

डिजिटल प्रणालीमुळे प्रत्येक व्यवहाराची नोंद होणार असल्याने बनावट नोंदी, लिंकिंग व काळा बाजारावर आळा बसणार आहे. यामुळे खत वितरण अधिक नियोजनबद्ध व पारदर्शक होणार आहे.

भूम तालुक्यात आतापर्यंत ४४ हजार २७१ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झाले असून उर्वरित शेतकऱ्यांची नोंदणी सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

> फार्मर आयडीमुळे खत वितरणात पारदर्शकता वाढणार असून शेतकऱ्यांना थेट लाभ मिळेल. गैरप्रकारांना पूर्णपणे आळा बसेल.
> **- अतुल ढवळे,** तालुका कृषी अधिकारी

### कुठे आणि कसा काढायचा फार्मर आयडी?

फार्मर आयडीसाठी तलाठी कार्यालय, सीएससी केंद्र किंवा कृषी विभाग कार्यालयात आधार कार्ड, सातबारा उतारा व मोबाईल क्रमांकासह नोंदणी करता येते. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना अनुदान थेट त्यांच्या खात्यात मिळणार असून मध्यस्थांची भूमिका कमी होणार आहे.

# तहसीलदारांवरील हल्ला; निषेधार्थ कामबंद आंदोलन



## अवैध वाळू प्रकरणावर कारवाईदरम्यान प्रकार; कर्मचाऱ्यांची संतप्त प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१७ एप्रिल -**
परंडा तहसीलचे कर्तव्यदक्ष तहसीलदार निलेश काकडे यांच्यावर दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी संघटनेने कामबंद आंदोलन सुरू केले आहे. याबाबतचे लेखी निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले.

निवेदनानुसार, दि.१५ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता अवैध वाळू उत्खननाबाबत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कारवाईसाठी जात असताना योगेश परमेश्वर मेटकरी (रा. पिठापुरी, ता. परंडा) व अन्य एका इसमाने तहसील कार्यालयाच्या आवारात येऊन तहसीलदारांची गाडी अडवली. त्यांनी आरडाओरडा, शिवीगाळ करत गाडीच्या काचा ठोठावून दहशत निर्माण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तहसीलदारांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला असता संबंधित आरोपीने हुज्जत घालत त्यांच्या अंगावर धावून गेल्याचेही निवेदनात म्हटले आहे. या घटनेची नोंद परंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. यापूर्वीही संबंधित आरोपीने दोन वर्षांपूर्वी ग्राम महसूल अधिकाऱ्यावर प्राणघातक हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर अशा प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. निवेदनावर तहसीलदार निलेश काकडे, नायब तहसीलदार पूजा गोरे, नायब तहसीलदार पेषकार, मंडळ अधिकारी पवार यांच्यासह सुमारे ४५ कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### प्रशासनावर प्रश्नचिन्ह

परंडा तालुक्यात अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची चर्चा असून रातोरात नदीपात्रातून वाळूची चोरी होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महसूल प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही बोलले जात आहे. सध्या केवळ करंजा येथील वाळू घाट सुरू असून इतर घाट बंद असल्याची माहिती आहे. बोटीच्या सहाय्याने वाळू उपसण्यासाठी परवानगी नसल्यामुळे वाळू माफियांकडून दबाव टाकला जात असल्याचेही समजते.

## संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयास शिक्षक आ. विक्रम काळे यांची सदिच्छा भेट

**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शिक्षकांशी विविध प्रश्नांवर चर्चा करत त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### कानेगाव येथे ३२ मुलींचे एचपीव्ही लसीकरण

**लोहारा, दि.१७ एप्रिल -**
जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास व जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्चपासून जिल्ह्यात एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू आहे. या अंतर्गत लोहारा तालुक्यातील कानेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात १६ एप्रिलपर्यंत एकूण ३२ लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले. यामध्ये लोहारा खू. ११, मोघा खू. ७, मोघा बु. ६, आर्णी ४, कानेगाव २, नागूर १ व मार्डी १ मुलींचा समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कानेगाव येथे दररोज लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत असून, आशा व आरोग्य कर्मचाऱ्यांनी १४ वर्ष पूर्ण व १५ वर्षांखालील मुलींना लसीकरणासाठी आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वैजनाथ घोडके यांना 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' सन्मान

**तुळजापूर, दि.१७ एप्रिल -**

श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य वैजनाथ घोडके यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल अमेरिका यांच्याकडून 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. डॉ.एस. राधाकृष्णन रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांच्या शिफारशीनुसार त्यांच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न व संस्थेच्या प्रगतीतील योगदानाची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व तहसीलदार माया माने यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

### बोरामणी येथे लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा २० एप्रिलला

**इटकळ, दि.१७ एप्रिल -**
बोरामणी येथे सोमवार दि.२० एप्रिल रोजी श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे.

लाल हनुमान मंदिरात सुरू असलेल्या श्री संत एकनाथ महाराज लिखित 'भावार्थ रामायण' ग्रंथातील युद्धकांडाच्या पारायणातून हा सोहळा सायं. ६ वाजता सुरू होऊन मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता समाप्त होणार आहे. या दरम्यान ७ अध्याय व ११३५ ओव्यांचे वाचन-निरूपण रात्रभर होणार आहे. समारोपानंतर महाआरती व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून परिसरातील रामभक्तांनी उपस्थित राहून रामकथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.



### नरेंद्र रडे यांचा सत्कार

**भूम, दि.१७ एप्रिल -**
कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे यांच्या शुक्रवारी दि.१७ रोजी महावितरण कार्यालय भूम येथे पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शरद चोरमले, उप विभागीय कार्यकारी अभियंता लक्ष्मण शिंदे, मुकुंद ढगे आदी उपस्थित होते. यावेळी महावितरण कार्यालय ईट येथील ३३ केव्ही केंद्र अंतर्गत डोकेवाडी, गिरवली, सोंन्नेवाडी, अंजनसोडा,

# ईट परिसरात महावितरण कर्मचाऱ्यांची अखंड सेवा; नागरिकांकडून कौतुक

## उन्हाच्या तडाख्यातही १७ गावांचा वीजपुरवठा सुरळीत



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ एप्रिल -**
ग्रामीण भागात काही वेळ वीजपुरवठा खंडित झाला तरी नागरिकांची गैरसोय होते. विशेषतः सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे पंखा, कुलर, टीव्ही यांसारख्या उपकरणांवरच लोकांचा दिवस अवलंबून असल्याने वीज ही अत्यावश्यक बाब बनली आहे.

अशा परिस्थितीत ईट येथील महावितरण कर्मचाऱ्यांनी अखंड सेवा देत वीजपुरवठा सुरळीत ठेवला असून त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ईट येथील महावितरणचे प्रभारी कनिष्ठ अभियंता मुकुंद ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली वायरमन बंडप्पा सास्तुरे, जगदीश शिंदे, देवीचंद फरतडे यांच्यासह इतर कर्मचारी दिवस-रात्र कार्यरत आहेत. उन्ह, वारा, पाऊस किंवा वादळ अशा कोणत्याही परिस्थितीत तांत्रिक बिघाड तात्काळ दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम ते करत आहेत.

ईट परिसरातील गाव, वाड्या-वस्त्यांमध्ये कुठेही बिघाड झाल्यास महावितरणचे कर्मचारी तत्काळ पोहोचून काही वेळातच वीजपुरवठा पूर्ववत करतात. अपुऱ्या मनुष्यबळावरही हे कर्मचारी १७ गावांचा कारभार सांभाळत आहेत. परिसरात थ्री-फेजचे सुमारे २६० तर सिंगल-फेजचे ६८ ट्रान्सफॉर्मर कार्यरत असून १० लाईनमन त्यांच्या देखभालीची जबाबदारी सांभाळत आहेत.

कोविड काळातही या कर्मचाऱ्यांनी आपली सेवा अखंड सुरू ठेवली होती. रात्री-अपरात्रीही गावकऱ्यांना अंधारात राहू न देता वीजपुरवठा सुरू ठेवण्यासाठी ते तत्पर असतात. त्यामुळे नागरिकांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

> ईट येथील बार डीपी, भोकर डीपी व दवाखाना डीपीवरील २५ क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर काढून त्या ठिकाणी १०० क्षमतेचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहेत. जिल्हा परिषद सदस्या शुभांगी देशमुख व राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील देशमुख यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या बदलामुळे गावठाण फीडर मजबूत झाला असून वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

> महावितरण कार्यालय ईट येथील प्रभारी कनिष्ठ अभियंता मुकुंद ढगे यांच्या नेतृत्वाखाली बंडप्पा सास्तुरे, जगदीश शिंदे, देवीचंद फरतडे, दीपक सोंन्रे, बप्पा बहिर, सिद्धेश्वर खांडेकर, जाधव, कोकाटे, रोमन, भालशांक, सर्फराज काझी आदी १० लाईनमन मिळून १७ गावांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम करत आहेत.

# नळदुर्गला काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद मिळणार?

## अशोक जगदाळे रेसमध्ये...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ एप्रिल -**
काँग्रेस पक्षाच्या धाराशिव जिल्हाध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू असून नळदुर्गचे नेते अशोक जगदाळे हे या पदासाठी इच्छुकांमध्ये अग्रस्थानी असल्याने शहरात उत्सुकता वाढली आहे.



आजवर नळदुर्गला कोणत्याही प्रमुख राष्ट्रीय पक्षाचे जिल्हाध्यक्षपद मिळाले नसल्याने यंदा ही संधी मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हाध्यक्षपदासाठी सुमारे १२ इच्छुक असून पक्षाची केंद्रीय टीम जिल्ह्यात तळ ठोकून आहे. एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या धाराशिव जिल्ह्यात सध्या पक्षाची स्थिती कमकुवत झाली आहे. अशा परिस्थितीत सर्व कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन पक्षाला बळ देणारे नेतृत्व आवश्यक असल्याची चर्चा आहे.

अशोक जगदाळे यांनी विधानसभा व विधानपरिषद निवडणुका लढविल्या असून त्यांचा जनसंपर्क दांडगा मानला जातो. नळदुर्ग नगरपालिकेत त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे २० पैकी ९ नगरसेवक निवडून आले आहेत.

त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी जगदाळे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

# वीज समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ॲड. अजित गुंड यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ एप्रिल -**
पाडोळी (आ.) येथील अनियमित वीजपुरवठा व ट्रान्सफॉर्मर बिघाडाच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी रूपामाता फाऊंडेशनच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

पुण्यपुरस्कार कार्यक्रमानिमित्त धाराशिव येथे आलेल्या उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ॲड. अजित गुंड-पाटील यांनी ग्रामस्थांच्या अडचणी मांडल्या. गावात वारंवार वीज खंडित होत असून विशेषतः रात्रीच्या वेळी दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.

वीजपुरवठा खंडित राहिल्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली असून, कमी दाबामुळे घरगुती व शेती उपकरणांवर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली. ट्रान्सफॉर्मरमधील बिघाड तात्काळ दूर करून नियमित वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महावितरणविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### अक्षरा हंगरगेकर हिचे सीबीएसई बोर्ड परीक्षेत सुयश

**तुळजापूर, दि.१७ एप्रिल -**
येथील माजी नगरसेवक अमर हंगरगेकर यांची कन्या अक्षरा अमर (दाजी) हंगरगेकर हिने दहावी सीबीएसई बोर्ड परीक्षामध्ये ९३.६% गुण मिळवले.



अक्षरा हिने धाराशिव येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिक्षण घेतले आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे तुळजाईनगरीतून अभिनंदाचा वर्षाव होत आहे.

# एनएच-६५ वरील येणेगुर पुलाची आ. स्वामींकडून पाहणी

## भगदाड दुरुस्तीसह अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्याच्या सूचना...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ एप्रिल -**
राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील येणेगुर (ता. उमरगा) येथे पुलावर भगदाड पडल्याची तक्रार नागरिकांनी केल्यानंतर आमदार प्रवीण स्वामी यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालक कासार यांना तात्काळ दुरुस्तीचे आदेश दिले. पुलावरील भगदाड लवकरात लवकर भरून सुरक्षित वाहतूक सुरू करण्यावर भर देण्यात आला. तसेच महामार्गावरील अपूर्ण राहिलेली कामे-विशेषतः सर्व्हिस रोड तसेच राज्यमार्गांना जोडणारे रस्ते-ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

स्थानिक नागरिकांनीही या पाहणीदरम्यान समस्या मांडत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

# तेर येथील संत गोरोबा काका मंदिरासाठी ३ कोटींचा निधी मंजूर

## ओव्हरी बांधकामासह विकासकामांना गती; भाविकांसाठी सुविधा वाढणार : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१७ एप्रिल -**
तेर येथील संतश्रेष्ठ संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरातील ओव्हरीच्या कामांसाठी तब्बल ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. या निधीमुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडणार असून दरवर्षी येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांसाठी महत्त्वपूर्ण सुविधा निर्माण होणार आहेत.

महायुती सरकारतर्फे मंजूर करण्यात आलेल्या या निधीतून मंदिराच्या मूळ रचनेला साजेशी विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. मंदिराच्या पूर्व बाजूस सुमारे २ कोटी रुपये खर्चून ओव्हरीचे बांधकाम करण्यात येणार असून वारी व उत्सवाच्या काळात भाविकांसाठी ही जागा विश्रांती व भजनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

यासोबतच ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी इतर कामेही केली जाणार आहेत. या कामांसाठी स्वतंत्रपणे १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामुळे मंदिराला प्राचीन व भव्य स्वरूप प्राप्त होणार आहे.



राज्याच्या ग्राम विकास विभागाने दि.१५ एप्रिल रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जाहीर केला असून ऑक्टोबर तांत्रिक मान्यता मिळाली होती. या तीर्थक्षेत्राचा 'ब' वर्ग यात्रास्थळ योजनेत समावेश करून निधी मिळवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता.

या विकासकामांमुळे तेर हे गाव केवळ धार्मिक स्थळ न राहता सुसज्ज पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानण्यात आले आहेत.

दरम्यान, तेर येथील कोट टेकडी परिसरात उत्खननावर आधारित जिवंत प्रात्यक्षिक प्रयोगशाळा उभारण्यासाठी १३.३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच प्राचीन तीर्थकुंड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालयात सुमारे २४ हजार ७६६ पुरातन अवशेषांचा मौल्यवान संग्रह असून या संग्रहालयाच्या नव्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे.

लवकरच येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संग्रहालय उभे राहणार असून

# उष्माघातापासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी- गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ झाली असून उष्णतेच्या तीव्र लाटेची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचा धोका वाढला असून नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

जिल्ह्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे. उष्माघात हा गंभीर ठरू शकतो, मात्र योग्य खबरदारी घेतल्यास त्यापासून बचाव करणे शक्य आहे, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क करण्यात आली असून जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वातानुकूलित कक्ष व आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे. आरोग्य विभागामार्फत नागरिकांमध्ये जनजागृतीही करण्यात येत आहे.

उष्माघाताची लक्षणे म्हणून तीव्र डोकेदुखी, स्नायू आखडणे, चक्कर येणे, उलटी, हृदयाचे ठोके वाढणे, चिडचिडेपणा, लघवीचे प्रमाण कमी होणे किंवा त्वचा कोरडी पडणे आदी लक्षणे दिसून येतात. अशी लक्षणे जाणवल्यास त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

नागरिकांनी पुरेसे पाणी पिणे, लिंबू सरबत, ताक, लस्सी, ओ-आरएस यांसारख्या पेयांचा वापर करणे आवश्यक आहे. बाहेर जाताना हलक्या रंगाचे, सैल व सुती कपडे वापरावेत. डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा. दुपारी १२ ते ३:३० या वेळेत उन्हात बाहेर जाणे टाळावे. तसेच कलिंगड, संत्री, द्राक्षे यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे खावीत.

दुपारच्या उन्हात कष्टाची कामे करणे टाळावे. चहा, कॉफी व मद्यपान टाळावे. बंद वाहनात लहान मुले किंवा पाळीव प्राणी सोडू नयेत.

एखाद्या व्यक्तीस चक्कर, मळमळ, ताप किंवा शुद्ध हरपल्यासारखे वाटल्यास त्याला सावलीत बसवावे, ओल्या कापडाने शरीर थंड करावे आणि त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करावे.

लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला, बाहेर काम करणारे कामगार तसेच हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी स्वतःची व कुटुंबियांची योग्य काळजी घेऊन सुरक्षित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे

# देवठाणा येथील ग्रामस्थांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

हिंगोली विधान सभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या कार्यशैलीवर आणि भारतीय जनता पार्टीच्या लोककल्याणकारी कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून देवठाणा येथील अनेक प्रमुख ग्रामस्थांनी आणि युवकांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजी तान्हाजीराव मुटकुळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेशाचा सोहळा उत्साहात पार पडला.

हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी मतदारसंघात राबविलेले विकासाचे जाळे आणि सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची त्यांची पद्धत यामुळे प्रभावित होऊन देवठाणा येथील नागरिकांनी भाजपचा झेंडा हाती धरला.

यावेळी शिवाजी मुटकुळे यांनी नूतन सदस्यांचे पुष्पहार घालून पक्षात स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना ते म्हणाले: पक्षाच्या ध्येयधोरणांना आणि तत्त्वांना समर्पित राहून सर्वांच्या हातून जनसेवेचे अधिकाधिक कार्य घडावे, हीच सदिच्छा आहे. भाजप हा कार्यकर्त्यांचा सन्मान करणारा पक्ष असून, नव्या सदस्यांमुळे गावाची ताकद अधिक वाढेल.

या पक्षप्रवेशामुळे देवठाणा परिसरात भारतीय जनता पार्टीची पकड अधिक मजबूत झाली असून, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या कार्यक्रमाला गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक आणि भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीची तयारी भारतीय जनता पक्षाकडून जिल्हाभरात करण्यात येत असून अनेक कार्यकर्ते पक्षात प्रवेश करीत आहेत.

# मंत्रालयातून यात्रेचा परवाना काढून देण्यासाठी सहा लाखांची फसवणूक, पाच जणांवर वसमत ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

यात्रेसाठी भाविक नेण्याचा परवाना मंत्रालयातून काढून देण्यासाठी सहा लाख रूपये घेवून फसवणूक केली तसेच पैसे परत मागितल्यानंतर मारहाण करणाऱ्या पाच जणांवर वसमत शहर पोलिस ठाण्यात गुरूवारी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात आता पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असून त्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार अकोला येथील टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचे सोईल अहमद खान यांच्या मार्फत माजीद पाशा रा वसमत व शेख अतीखूर रहेमान, शेख रिजवान रा अर्धापूर हे भाविकांना यात्रेसाठी पाठवित होते. मात्र सोई यांच्याकडे भाविक यात्रेसाठी पाठविण्याचा परवाना नसल्याने ते इतरांच्या माध्यमातून भाविकांना यात्रेसाठी पाठवित होते. मागील दोन ते तीन वर्षापासून त्यांचे व्यवहार सुरू होते.

दरम्यान, यात्रेसाठी भाविकांना पाठविण्याचा मंत्रालयातून परवाना काढून देतो असे सांगत वरील तिघांनी सोईल खान यांच्याकडून सन २०२४ मध्ये सहा लाख रूपये घेतले. त्यानंतर त्यांनी काही कागदपत्रे घेतली. आता मंत्रालयातून परवाना मिळाल्यानंतर आपल्याच टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स कंपनीकडून भाविकांना यात्रेसाठी पाठविता येईल अशी सोईल यांना अपेक्षा होती. मात्र सहा लाख रूपये घेतल्यानंतर त्यांनी काहीही केले नाही. या प्रकारामुळे सोईल खान यांनी पैसे परत देण्याची मागणी केली. मात्र तिघेही रक्कम देण्यास टाळाटाळ करू लागले होते. आपली फसवणूक झल्याचे लक्षात येताच त्यानी पैशाचा तगादा लावला. मा९ शेख माजीद याने आणखी काही भाविकांना यात्रेसाठी पाठवायचे आहे असे सांगत सोईल यांना दि १४ एप्रिल रोजी बोलावून घेतले. त्यानंतर त्यांना एका वाहनामध्ये बसवून अर्धापूरकडे नेले. त्याठिकाणी पाच जणांनी मिळून त्यांना मारहाण करीत मोबाईलमधील डेटा डिलीट केला. याप्रकरणी सोईल खान यांनी वसमत शहर पोलिस ठाण्यात आरोपींविरूध्द तक्रार दिली असून पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



हिंगोली- शहरातील मध्यवस्ती असलेल्या पलटण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या परिसरात काही खोके व दुचाकी, चारचाकी वाहने असून जवळच कचरा टाकल्या जात आहे. शुक्रवारी येथील परिसरात अचानक आग लागली होती. वेळेवर आग विझवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. छाया- सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### राजे संभाजीमध्ये डॉ. आंबेडकर जयंती साजरी

हिंगोली- स्मृतीशेष अँड. ग्यानबारावजी शिरसाट बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे दिनांक १४/०४/२०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. उमेश शेळके सर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, त्याचबरोबर महाविद्यालयातील प्रा. सौ. ज्योती भट्ट, प्रा मुरलीधर डोल्हारे, प्रा. श्री संदीप जाधव, प्रा. ज्ञानेश्वर सिरसाट, प्रा. शेख इरफान, व शिक्षकेत्तर कर्मचारी शशिकांत बोरकर, ओम इंगोले, शेख इमरान यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### हिंगोलीत दामिनी पथकाची कारवाई

हिंगोली- दामिनी पथक प्रभारी सपोनी प्रेमलता जगताप,सोबत दामिनी पथकातील अंमलदार असे शहरामध्ये पेट्रोलिंग दरम्यान शहरातील गर्दीचे ठिकाणे, बस स्टँड, शाळा, महाविद्यालय परिसर, कॅफे, गार्डन इत्यादी ठिकाणी दामिनी पथक गस्त करीत असतांना ,जिजामाता नगर हिंगोली येथील सिद्धिविनायक गणेश मंदिराचे गार्डनला अचानक भेट दिली असता तेथे एक ईसम जोरजोरात आरडाओरड करून असभ्य वर्तन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असतांना मिळून आला म्हणून सदर इसमावर हिंगोली शहर येथे ११०/११७ मुपोका प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली. सदर गार्डन परिसराचे आजूबाजूला बऱ्याच शाळा, महाविद्यालय तसेच कोचिंग क्लास असून विद्यार्थी तसेच बाहेर गावचे मुले, मुली वस्तीमधील या गार्डनमध्ये येऊन मंदिर परिसरामध्ये फोटो काढणे, आरडाओरड करणे असभ्य वर्तन करणे या बाबत आलेल्या तक्रारी अनुषंगाने केलेली ही गस्त व कार्यवाही असल्याचे दामिनी पथक अधिकारी जगताप यांनी सांगितले, तसेच अशा प्रकारचे कोणत्याही ठिकाणी असभ्य, गैरकृत्य चालणार नाही व संबंधित आढळून आलेल्यांवर गुन्हे दाखल करून प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले आहे.

### उन्हामुळे ऊसाच्या रसाला अधिक पसंती

हिंगोली-यंदा मार्च महिन्यातच उन्हाचा तडाखा जाणवू लागला आहे. गेल्या आठ दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून, उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. रसवंतिगृहामध्ये ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. जिल्हाभरात अनेक ठिकाणी रसवंती दुकानांवर नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी ऊसाच्या रसाला पसंती देत आहेत. परवडणाऱ्या दरात आणि शरीराला पोषक असल्यामुळेही लोक रसवंतीच्या दुकानात दिसत आहेत.

# ८५ हजारांचा मुद्देमाल पळविला, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

शहरालगत बळसोंड भागात किरकोळ कारणावरून एकास मारहाण करून ५८ हजारांचा मुद्देमाल पळविल्याची घटना घडली असून याप्रकरणी तिघांवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनसार शहरातील मंगळवारा भागातील रहीवाशी बालाजी चव्हा हे शहरालगत बळसोंड येथे प्लॉटवर कामासाठी गेले होते. यावेळी त्याठिकाणी काम करीत असतांना कृष्णा भोसले, पंकज सोळंके, समीक कांबळे हे तिघेजण आले. यावेळी कृश्णा यांने तू एका महिलेस पैसे उधार का दिलेस या कारणावरून बालाजी यांच्याशी वाद घालण्यास सुरूवात केली. शाब्दीक चकमकीनंतर वाद वाढत गेला. यामध्ये कृष्णा, पंकज आणि समीक यांनी बालाजी यांना काठीने मारहाण केली. त्यात ते गंभीर जखमी झाले. तिघांनी बालाजी यांच्या हातातील चांदीचे कडे, अंगठ्या, रोख २० हजार रूपये असा एकूण ८५ हजारांचा मुद्देमाल पळविला.

या मारहाणीत गंभीर जखमी णालेल्या बालाजी यांना रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्या तक्रारीवरून तिन आरोपीविरूध्द हिंगोली ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्यामकुमार डोंगरे हे करीत आहेत.

# साळणा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**



औंढा तालुक्यातील साळणा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे शुक्रवारी (ता.१७) एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले होते.या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून नागरिकांनी विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. हे छत्रपती शिवाजी महाराज महाराज समाधान शिबिर उपविभागीय अधिकारी विकास माने व प्र. तहसीलदार प्रवीण ऋषी यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार अनिता कोलगणे, मंडळ अधिकारी प्रभाकर काळे, साळणा सरपंच भाग्यश्री पांडुरंग कुटे, उपसरपंच नारायण खिल्लारे, माजी सरपंच रमेशराव सानप, नामदेव देवकर,उपनिबंधक प्रदीप महालनकर,कृषी अधिकारी संजय घोंगडे, पुरवठा अधिकारी राजकुमार डुरे आदी उपस्थित होते.

सातबारा दुरुस्ती, जिवंत सातबारा मोहीम, वारस नोंदी, महिलांच्या नावांची नोंद, रेशनकार्ड दुरुस्ती, मतदान ओळखपत्र, शिधापत्रिका, वय व अधिवास प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, जन्म व मृत्यू प्रमाणपत्र, संजय गांधी व श्रावणबाळ योजना तसेच विविध दाखले नागरिकांना देण्यात आले. प्रलंबित फेरफार प्रकरणेही निकाली काढण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज स्व अभियानात पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, शिक्षण विभाग, महसूल विभाग, रोजगार हमी विभाग, मंडळातील तलाठी सज्जे, आपले सरकार सेतू सुविधा केंद्र, कृषी विभाग यासह विविध विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी मंडळाधिकारी प्रभाकर काळे व भूमीअभिलेख उपनिबंधक प्रवीण महानकर, पुरवठा अधिकारी राजकुमार डुरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी साळणा गावासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने शिबिरास उपस्थित होते. या शिबिराचे प्रस्तावना सचिन जोंधळे, सूत्रसंचालन लता बोडके तर आभार मंडळाधिकारी पी आर काळे यांनी मानले.

# १८ तास अखंड वाचन करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना श्रध्दांजली



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ एप्रिल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त केवळ घोषणांपुरते न थांबता, कृतीतून आदर व्यक्त करण्याचा प्रेरणादायी उपक्रम वसमत शहरात राबविण्यात आला. आसेगाव रोडवरील विठाई सार्वजनिक वाचनालय अंतर्गत यशवंत मुलींच्या अभ्यासिकेत विद्यार्थिनींनी तब्बल १८ तास अखंड अभ्यास करत बाबासाहेबांना अनोखी मानवंदना अर्पण केली.

दि. १३ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता सुरू झालेला हा उपक्रम मध्यरात्रीनंतर १ वाजेपर्यंत सुरू राहिला. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या सुमारे ४० विद्यार्थिनींनी या अभ्यास सत्रात सहभागी होत, शांतता आणि शिस्तीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे शस्त्र आहे या बाबासाहेबांच्या विचारांचा अंगीकार करत, विद्यार्थिनींनी अभ्यासालाच आपली खरी श्रद्धांजली मानली. कोणताही दिखाऊ कार्यक्रम न करता, पुस्तकेच हातात घेऊन दिलेली ही मानवंदना विशेष ठरली. विठाई वाचनालयाचा हा उपक्रम मागील दशकभर सातत्याने राबविला जात असून, यंदा त्याचे दहावे वर्ष पूर्ण झाले. त्यामुळे यावर्षीचा उत्साह अधिकच वाढलेला दिसून आला. उपक्रमाच्या समारोपावेळी संस्थापक प्रा. डॉ. नामदेव दळवी व ग्रंथपाल श्रीमती शारदा नादरे यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थिनींच्या चिकाटीचे कौतुक करत, शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजपरिवर्तन शक्य असल्याचा संदेश दिला. शहरातील हा उपक्रम केवळ वेगळाच नाही, तर नव्या पिढीसाठी दिशादर्शक ठरत असून, कृतीतून व्यक्त होणारी श्रद्धांजलीच सर्वात प्रभावी असते, हे पुन्हा अधोरेखित झाले.

# सृजन शाखा मारवाडी महिला समितीची स्थापना व पदग्रहण सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ एप्रिल**

हिंगोली सृजन शाखा मारवाडी महिला समितीची स्थापना आणि नवनियुक्त कार्यकारिणीचा शपथविधी सोहळा येथील खंडेलवाल ज्वेलर्सच्या इव्हेंट हॉलमध्ये पार पडला.

सृजनशाखेच्या नूतन कार्यकारिणीत खालील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अध्यक्ष सौ. रश्मी संकेत केडिया, सचिव सौ. शुभी कौशल खंडेलवाल, कोषाध्यक्ष सौ. प्रिया गौरव झुंझुनवाला, उपाध्यक्ष सौ. पायल विशाल अग्रवाल, सहसचिव सौ. अंकिता निखिल अग्रवाल.

अखिल भारतीय मारवाडी महिला समिती, हिंगोलीच्या संस्थापिका अध्यक्षा सौ. पुष्पा सुराना यांनी नवनियुक्त कार्यकारिणीला शपथ दिली. तसेच, माजी अध्यक्षा सौ. मंजू बगडिया यांनी सृजन शाखेच्या नवीन अध्यक्षचे स्वागत केले.

या कार्यक्रमास डॉ. सौ. पूनम गौड, डॉ. सौ. निशा अग्रवाल, सौ. आरती केडिया, सौ. पूजा सोनी, सौ. राधिका झंवर, सौ. पलक अग्रवाल, सौ मनीषा केडिया, डॉ. सौ. प्राची अग्रवाल, सौ. स्नेहा अग्रवाल, सौ. सृष्टी अग्रवाल, सौ. वर्षा कायल, सौ. प्रियंशा शर्मा, सौ. नम्रता व्यास, सौ. मनीषा बोरा, सौ. शोभा सोनी, सौ. मनीषा केडिया, सौ. मेघा कागलीवाल, सौ. सविता अग्रवाल, सौ. सुनीता तिवारी, कु. मुस्कान अग्रवाल आणि इतर सदस्य उपस्थित होते.

# घोटी येथे १ कोटींच्या 'ध्यान केंद्र समाज मंदिराचे' थाटात लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १७ एप्रिल -**

तालुक्यातील मौजे घोटी येथे श्री श्री श्री परमहंस सद्गुरु संत श्री फुलाजी बाबा यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या भव्य ध्यान केंद्र समाज मंदिराचा लोकार्पण सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला. लोकप्रिय आमदार भीमरावजी केराम यांनी आपल्या निधीतून १ कोटी रुपये खर्च करून हे भव्य समाज मंदिर ग्रामस्थांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

या समाज मंदिराचे रीतसर लोकार्पण आमदार भीमरावजी केराम यांचे ज्येष्ठ सुपुत्र क्रांतीशरण भीमराव केराम यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून केशव दादा इंगळे आणि वामन दादा इंगळे यांची उपस्थिती होती.

या विशेष सोहळ्याप्रसंगी गावच्या सरपंच निर्मलाबाई मेश्राम, उपसरपंच राजू सुरोसे पाटील, संस्थानचे अध्यक्ष आनंदराव सुरोसे पाटील, भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधाकर भोयर, काँग्रेस पक्षाचे युवा नेते डॉ. पुंडलिक आमले, पंढरीनाथ ठाकरे, यशवंतराव कराळे पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष देवरत मुनेश्वर आणि गोपीनाथ बुलबुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

**हे केंद्र वैचारिक परिवर्तनाचे केंद्र ठरेल : क्रांतीशरण केराम**

लोकार्पण प्रसंगी मनोगत व्यक्त करताना क्रांतीशरण केराम म्हणाले की, आमदार भीमराव केराम यांनी नेहमीच विकासासोबत आध्यात्मिक वारसा जपण्याला प्राधान्य दिले आहे. फुलाजी बाबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी हे ध्यान केंद्र मैलाचा दगड ठरेल. केवळ इमारत उभी करणे हा उद्देश नसून, या माध्यमातून गावात शांतता, भक्ती आणि सामाजिक एकोपा वाढीस लागावा हीच आमदारांची भावना आहे. १ कोटींच्या निधीतून साकारलेले हे मंदिर ग्रामस्थांच्या श्रद्धेचा सन्मान आहे.



आमदार भीमराव केराम यांनी आध्यात्मिक आणि सामाजिक बांधिलकी जपत घोटी येथे १ कोटींचा निधी देऊन हे ध्यान केंद्र उभारल्याने नागरिकांची मोठी सोय झाली आहे. जय सद्गुरु फुलाजी बाबा च्या जयघोषात पार पडलेल्या या कार्यक्रमात मान्यवरांनी आमदारांच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले. या ध्यान केंद्रामुळे गावातील सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांना मोठी चालना मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुण मंडळाने आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. या लोकार्पण सोहळ्यामुळे संपूर्ण घोटी परिसरात आनंदाचे आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# एकमताचा आवाज! नरसी सोसायटी कडून श्रावण भिलवंडे यांना मतदानाचा अधिकार बहाल

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १७ एप्रिल -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नरसी सेवा सहकारी सोसायटीने घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय सध्या नरसी सह संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. सोसायटीच्या विशेष सभेत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते श्रावण पा.भिलवंडे यांना मतदानाचा अधिकार बहाल करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला .या निर्णयामुळे सहकार क्षेत्रात नव्या समीकरणांची जोरदार चर्चा रंगू लागली असून, सदस्यात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नायगांव तालुक्यातील नरसी येथील सोसायटी सभागृहात सकाळी १० वाजता नरसी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमनच्या अध्यक्षतेखाली ही विशेष सभा पार पडली. आवश्यक कोरम पूर्ण झाल्यानंतर सभेची सुरुवात झाली. प्रारंभी नियमित विषयांवरील ठराव मंजूर करण्यात आले. दरम्यान, काही कारणांमुळे सभेत अल्पकाळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. या गडबडीत गटसचिवांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांनी सभेची सूत्रे प्रशासकीय चेअरमन व संचालक मंडळाकडे सोपवून उपचारासाठी प्रस्थान केले.



यानंतर सभेची कार्यवाही पुन्हा सुरळीत सुरू करण्यात आली. सदस्य पांडुरंग नागेश्वर यांनी नांदेड जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी मतदानाचा अधिकार श्रावण शंकरराव भिलवंडे यांना देण्याचा ठराव सभेपुढे मांडला. सुरुवातीला काही सदस्यांकडून आक्षेप नोंदवण्याचा प्रयत्न झाला असला, तरी बहुसंख्य सदस्यांनी ठाम पाठिंबा दर्शवत हात उंच करून हा ठराव बिनविरोध मंजूर केला.

या प्रस्तावास पांडुरंग जळबा नागेश्वर यांनी सूचक म्हणून मांडणी केली, तर मारोती रामचंद्र बुक्के यांनी अनुमोदन देत पाठिंबा नोंदविला. अखेरीस प्रशासकीय संचालकांच्या स्वाक्षरीने ठराव विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे.

श्रावण पाटील भिलवंडे यांना बहाल करण्यात आलेल्या या अधिकाराबाबत सोसायटी सदस्यांमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. सहकार क्षेत्रातील त्यांचा दीर्घ अनुभव आणि नेतृत्वगुण लक्षात घेता आगामी निवडणुकीत प्रभावी भूमिका बजावतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, भविष्यातही सहकार चळवळ बळकट करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे ठरेल, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त केल्या जात आहे.

# सिडकोत महामनव डॉ. आंबेडकर जयंती शांततेत साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ एप्रिल -**

सिडको-हडको परिसरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती नेहमीपेक्षा अगदी शांततेत पार पडली विशेष म्हणजे डीजेच्या कर्कश्य ध्वनी प्रदर्शनापासून सिडको करांना मोठा दिलासा मिळाला असल्याने पूर्ण जयंती शांततेत व हर्षवलासात पार पडली.

सिडको हडको परिसरात सर्व बौद्ध विहारात सकाळी ११ वाजेच्या सुमारास पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर चशील त्रिशरण पठण करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. आणि त्यानंतर दुपारच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य तैलचित्राची सिडकोच्या मुख्य रस्त्याने मिरवणूक काढण्यात आली. सदरील मिरवणुकी नंदिग्राम बौद्ध विहार संभाजी चौक जयंती मंडळ, राहुल नगर वाघाळा जयंती मंडळ, विश्वशांती बौद्ध विहार शाहूनगर जयंती मंडळ, राहुल नगर एनडी४१ सिडको जयंती मंडळ, श्रावस्ती बुद्ध विहार जे -३ वैभव नगर जयंती मंडळ, भिम वाडी जयंती मंडळ, बळीरामपूर जयंती मंडळ, सांची बुद्धविहार जयंती मंडळ, विश्वशांती बुद्ध विहार जयंती मंडळ वाघाळा, रमा माता बुद्ध विहार जयंती मंडळ यांच्यासह अनेक जयंती मंडळांनी मिरवणुकीत सहभाग नोंदवला होता तेव्हा या मिरवणुकीत बालक, बालिका, महिला व ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सदरील मिरवणूक पारंपारिक वाद्यसह पोलीस प्रशासनाने दिलेल्या नियमाप्रमाणे साऊंड बॉक्स चा आवाज मर्यादित ठेवून अगदी शांततेत मिरवणूक नाचून साजरी करण्यात आली. यावेळी विविध संघटनांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी भोजनदान, पिण्याचे थंड पाणी व खिचडी वाटपाचे ठिकठिकाणी आयोजन करण्यात आले होते. यावेळी मिरवणुकी दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# विभाग नियंत्रकांच्या आश्वासनानंतर भाग्यश्री कल्याणकर यांचे उपोषण मागे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १७ एप्रिल -**

अर्धापूर शहरातील बसस्थानक येथे शौचालयाची सुविधा व इतर भौतिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, यासाठी उपतालुकाप्रमुख भाग्यश्री कल्याणकर दि.१५ एप्रिलपासून उपोषण सुरु केले होते. दरम्यान राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांनी मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने भाग्यश्री कल्याणकर यांनी उपोषण मागे घेतले आहे.

अर्धापूर बसस्थानकात महिलांसाठी शौचालयाची व्यवस्था नाही, शौचालयाची तात्पुरती व्यवस्था असल्याने महिलांची कुचंबना होत आहे. त्यातच बसस्थानक परिसरात खाजगी वाहन चालक वाहने लावत असल्यामुळे प्रवाशांची अडचण होत असून, बसस्थानक परिसरात शौचालयाची सुविधा करावी व खाजगी वाहनांना प्रतिबंध घालावा या मागणीसाठी भाग्यश्री कल्याणकर यांनी दि.१५ एप्रिलपासून उपोषण सुरु केले होते. दरम्यान विभाग नियंत्रकांनी महिलांची दुरावस्था दूर करण्याचे तसेच खाजगी वाहनावर प्रतिबंध लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर भाग्यश्री कल्याणकर यांनी उपोषणातून माघार घेतली आहे.

## बेटसांगवी येथील शेतकऱ्याची मुलगी डॉ. सुगंधा वानखेडे एमबीबीएस उत्तीर्ण

**सोनखेड-** सोनखेड पासून जवळच असलेल्या बेटसांगवी मोहनपुरा येथील डॉक्टर सुगंधा वानखेडे ही नुकतीच एमबीबीएस उत्तीर्ण झाली आहे. बेटसांगवी मोहनपुरा.ता.लोहा येथील शेतकरी कुटुंबातील कन्यारत्न आणि सदन कास्तकार कुटुंबाची सून डॉ.सौ.सुगंधा व्यंकटी गाढे रा.पांगरगाव ता.मुदखेड या दोन्हीही कुटुंबाची मर्जी राखून संसारिक जबाबदारी सांभाळत डॉ.सुगंधा सुरेखा संजय वानखेडे या विद्यार्थिनीने डॉक्टर पंजाबराव देशमुख आलियास भाऊसाहेब देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज अमरावती येथे अत्यंत जिद्द,चिकाटी व मेहनतीने चार वर्षाचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि ती नुकतीच एमबीबीएस उत्तीर्ण झाली आहे तिच्या या यशाबद्दल माहेर व सासरच्या मंडळींनी अभिनंदन करून तिला शुभेच्छा दिल्या आहेत.



## उमरी शासकीय आयटी आयमध्ये स्वच्छता मोहीम

**उमरी -** महाराष्ट्र शासनाने स्वच्छता ब्रँड अँबेसेडर म्हणून राष्ट्रसंत सदगुरू साईनाथ महाराज यांची नियुक्ती झाल्या पासून महाराष्ट्रभर स्वच्छता मोहीम राबवित असुन उमरी शासकीय आय टी आय येथे दि १६ एप्रील रोजी स्वच्छता मोहीम व मार्गदर्शन केले आहे या मोहीमेला उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला आहे . उमरी आय टी आय या शासकीय संस्थेस संतकवी दासगणू शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था म्हणून नाव देण्यात आले आहे पहिल्यांदा राष्ट्रसंत साईनाथ महाराज बितनाळकर उर्फ वसरतकार यांची स्वच्छता मोहीम राबविली तसेच संस्थेतील विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले. त्यावेळी संस्थेचे प्राचार्य गायकवाड जे.एल, उपप्राचार्य परदेशी एम.बी, आणि सौ. भोसले ए.सी, सौ. गुजरावर एस डी,अजय माळी, फोले बी.के, सचिन देशमाने, शपवार आर. पी, विकास देशमाने, बितनाळचे उपसरपंच प्र देविदास अक्कमवाड , शंकर म्याकलवाड , देविदास घुमलवाड , गंगाधर तनबुदले , प्रमोद आटपलवाड लक्ष्मण वाघमारे, नागन आन्नेमवाड आदी उपस्थित होते.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मार्च अखेर ५३ कोटीच्या नफ्यात तर संचित तोट्यातुन मुक्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १७ एप्रिल -**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात्त भाग भांडवल मध्ये मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. या वर्षी मार्च अखेर बँकेला ढोबळ नफा ५३.७ कोटी रुपये झाला तर वैधानिक तरतुदींनंतर निव्वळ नफा ७.३३ कोटी रुपये झाला असून एनपीए कमी झाला असल्याची माहिती नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी आज पत्रकार परिषदेत माहिती दिली. ही बँक नांदेड जिल्हयातील शेतक-यांची कामधेनू आहे.



या बँकेच्या पुर्नउभारणीमध्ये महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खा. अशोकराव चव्हाण व तत्कालिन अर्थ मंत्री स्व. अजितदादा पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचेही खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या बँकेवरचा ग्राहकांचा विश्वास वाढला असून या बँकेमध्ये मोठ्याप्रमाणात ग्राहक ठेवी जमा करत आहेत. या बँकेच्या एकुण ६३ शाखा असून ५८ शाफा नफयात आहेत. ही प्रगती केवळ आकडयापुरती मर्यादीत नसून ती आपल्या संचालक मंडळाची व बैंक व्यवस्थापनाची असल्याचेही खतगावकर यांनी म्हटले आहे.

बँकेच्या या अर्थपूर्ण वाटचालीमध्ये बँकेचे संचालक मंडळ, कर्मचारी, सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याचेही बँकेचे अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष माजी आ. हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर, सचालक बाळासाहेब रावणगावकर, गोविंदराव पाटील शिंदे नागेलीकर, बाबुराव कोंढेकर, शिवराम लुटे, राजेंद्र केशवे, राजेश पावडे, व्यंकटराव जाळणे, विजयाताई शिंदे, शाम कदम, रामचंद्र मुसळे, माजी उपमहापौर सरजीतसिंग गील, एन.डी.पवार, जगनाथ चक्रावार, बँकेचे सीईओ अजय कदम व सर्व कर्मचारी आदि उपस्थित होते.

# नगर परिषदेच्या अभ्यासिकेला मिळणार डॉ. आंबेडकरांचे नाव

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. १७ एप्रिल -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात नगर परिषदेच्या सार्वजनिक वाचनालयातील अभ्यासिकेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी आंबेडकरी अनुयायांनी केली.

दरम्यान, बिलोली शहरातील सार्वजनिक वाचनालयातील अभ्यासिकेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी यापूर्वीच नगरसेविका सौ. आम्रपाली प्रकाश पोवाडे व नगरसेविका सौ. अनुपमा महेंद्र गायकवाड यांनी नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्याकडे केली होती.

या मागणीस उपाध्यक्ष अनुप अंकुशकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, ही मागणी तात्काळ मान्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच, नगरपालिकेत यासंदर्भात लवकरच ठराव मंजूर करून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार रत्नाकर जाधव, प्रकाश पोवाडे, संजय जाधव, संजय पोवाडे, महेंद्र गायकवाड, धम्मपाल जाधव यांनीही नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी व उपाध्यक्ष अनुप अंकुशकर यांच्याकडे अभ्यासिकेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव लवकरात लवकर देण्याची मागणी केली.

हदगांव नगर परिषद हदगांव
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id- cohadgaon@gmail.com स्थापना 1954
ह.न.प.जा.क्र./२६५/ २०२६ दिनांक १६/०४/२०२६

ई-निविदा सुचना

नगर परिषद, हदगाव कडून १५ वा वित्त आयोग योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत साफसफाईच्या कामाबाबत योग्य त्या खुला वर्गातील कंत्राटदाराकडून कामांची ई-निविदा बी-१ नमून्यात मागविण्यात येत आहेत. ई-निविदा दिनांकः १७/०४/२०२६ सकाळी ११.०० ते दि.२४/०४/२०२६ दुपारी, ०१.०० वाजेपर्यंत पाहणे, डाऊनलोड करणे व ऑनलाईन भरता येईल ई-निविदेची सर्व आवश्यक दिनांक व सविस्तर ई-निविदा अटी व शर्तीसह शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पहावयास मिळतील.

स्वा.
मुख्याधिकारी
नगर परिषद, हदगाव

# दिल्लीत खा. चव्हाण यांच्या दरबारी नगरसेवक सूर्यवंशी!

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १६ एप्रिल -**

हदगावच्या स्थानिक राजकारणात सध्या एक वेगळाच ट्रेंड पहायला मिळत असून सत्तेपेक्षा सलोख्याची राजकारणाची नवी व्याख्या काँग्रेसचे नगरसेवक अजय सूर्यवंशी यांनी थेट दिल्ली गाठत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



शहरातील विकासकामांच्या नावाखाली झालेली ही भेट केवळ औपचारिक नव्हती, तर त्यामागे मतदारसंघातील सत्तासमीकरणांची नव्याने जुळवाजुळव असल्याची चर्चा रंगत आहे. मराठवाड्यासह राज्यात आपला प्रभाव कायम राखणारे अशोक चव्हाण यांच्याकडे स्थानिक पातळीवरील नेत्यांची वाढती वर्दळ हे येणाऱ्या राजकीय बदलांचे संकेत मानले जात आहेत. महापालिकेच्या अस्तित्वापासून नांदेड मनपावर कधीच 'भाजपा' चा झेंडा फडकला नव्हता परंतु राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच नांदेड महापालिकेवर 'कमळ' फुलल्याने त्यांची नांदेड जिल्ह्यात असलेली 'पकड' पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीतही त्यांनी नांदेड जिल्ह्यात त्यांचा राजकीय 'करिष्मा' दाखवून दिला हे सर्वश्रुत आहे. नगरसेवक सूर्यवंशी यांनी पक्षभेद बाजूला ठेवत 'विकास' हा मुद्दा पुढे करत दिल्लीत थेट लॉबिंग केल्याने स्थानिक काँग्रेसमध्येही काहींच्या भुवया उंचावल्या आहेत.

राजकीय अनुभवाचा मोठा साठा असलेल्या सूर्यवंशी यांनी पूर्वी अनेक दिग्गज नेत्यांसोबत काम केले आहे. मा. खा. सुभाष वानखेडे व तत्कालीन आ. माधवराव पाटील जवळगावकर यांचे सूर्यवंशी यांनी खाजगी सचिव म्हणून उत्तमरीत्या काम पाहिले हे विशेष आहे तसेच हिंगोली लोकसभा मतदार संघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्यासोबतही असलेले त्यांचे सलोख्याचे संबंध त्यांना वेगळी ओळख देतात. पण आता त्यांनी थेट दिल्ली गाठत मोठ्या नेतृत्वाशी साधलेला संपर्क हा केवळ विकासासाठी आहे की पुढील राजकीय पाऊल टाकण्याचा संकेत हा प्रश्न अनुत्तरित आहे.

दरम्यान, विकासासाठी सर्वांसोबत हा संदेश देत सूर्यवंशी यांनी घेतलेली ही भेट शहराच्या राजकारणात नवे समीकरण निर्माण करणारी असल्याचे दिसून येत आहे.

**पालिकेत अजय सूर्यवंशी यांची समन्वयाची भूमिका**

हदगाव पालिकेत निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या मतभेदांच्या वातावरणाने प्रशासन ठप्प होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असताना अजय सूर्यवंशी यांनी केवळ प्रेक्षकाची भूमिका न घेता पुढाकार घेतला आणि सर्वपक्षीय नगरसेवकांमध्ये संवादाची नवी दारे उघडली. आपापसातील गैरसमज, राजकीय अहंकार आणि गटबाजी यांना बाजूला सारत त्यांनी समन्वयाचा धागा मजबूत केला. परिणामी, अडथळ्यात अडकलेल्या सर्वसाधारण सभांना मार्ग मोकळा झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेकदा सत्तासंघर्षच केंद्रस्थानी राहतो मात्र सूर्यवंशी यांनी 'समन्वय हाच खरा विकासाचा पाया' हे अधोरेखित करत व्यवहार्य आणि परिपक्व नेतृत्वाचे उदाहरण घालून दिले आहे ही बाब हदगावच्या राजकारणासाठी केवळ सकारात्मक संकेत नसून पुढील काळातील राजकीय दिशाही ठरवणारी ठरू शकते.

हदगांव नगर परिषद हदगांव
०२४६८ ऑफिस २२२४०८
Email-id- cohadgaon@gmail.com स्थापना 1954
ह.न.प.जा.क्र./बा./वि./२६५/ २०२६ दिनांक १६/०४/२०२६

ई निविदा प्रसिद्धीकरण सूचना
(नागरी दलीत्तेत्तर सुधार वस्ती योजना)

मुखाधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथता अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिद्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अनु क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | ई- निविदा फॉम फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद हदगाव येथील सुभद्रा नगर अंतर्गत नांदेड रोड ते कस्तुरी मंगल कार्यालयापर्यंत सी सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९९,९९,६८० | ११९९५३/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ४ व त्यावरील | १८० दिवस | १५०००/- |
| २ | नगर परिषद हदगाव येथील आझाद चौक ते भंगी गल्ली पर्यन्त सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९,९६,४००/- | | | | | |
| ३ | नगर परिषद हदगाव येथील कमलाई नगर अंतर्गत धोंडे यांचे घर ते शेवडकर यांच्या घरापर्यंत सी सी. रस्त्याचे बांधकाम करणे | ९,९९,२००/- | | | | | |
| | | १.१९.९५.२८०/- | | | | | |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दि १७.०४.२०२६ ते १२.०५.२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि १२.०५.२०२६ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

स्वा.
मुख्याधिकारी
नगर परिषद, हदगाव

## पोर्टरने छत्रपती संभजीनगरमध्येएमएसएमई आणि स्थानिक व्यवसायांसाठी सेवा सुरू केल्या

छत्रपती संभजीनगर– भारतातीलआघाडीची डिजिटल मालवाहतूक संस्था, पोर्टरने आज छत्रपती संभजीनगरमध्येप्रवेशाची घोषणा केली. यामुळे शहरातील वाढत्या व्यवसाय आणि एमएसएमई परिसंस्थेसाठीकार्यक्षम आणि विश्वासार्ह मालवाहतूक सक्षम करण्याचे त्यांचे ध्येय अधिक मजबूतझाले आहे. सुरुवातीला टू-व्हीलर लॉजिस्टिक सेवांसह कामकाज सुरू करण्यात आले असून,शाश्वत आणि कार्यक्षम मालवाहतुकीला समर्थन देण्यासाठी आगामीमहिन्यांत थ्री-व्हीलर्स आणि टाटा एस यांसारख्या मोठ्या वाहनांच्या श्रेणी सुरूकरण्याची योजना आहे.छत्रपती संभजीनगरमधीलऑटोमोबाईल सुटे भाग, वस्त्रोद्योग आणिपर्यटन-चालित व्यवसायांमधील एमएसएमईंचा विविधतेने नटलेला पाया पाहता, पोर्टरचा येथील प्रवेश शहराची मालवाहतूक परिसंस्था मजबूत करण्यासाठी एकउत्तम संधी प्रदान करतो. शहरातील विस्तारत असलेल्या औद्योगिक वसाहती, तसेच स्थानिक व्यवसाय आणि व्यावसायिक आस्थापनांचा मोठा पाया यामुळे कच्चामाल, तयार उत्पादने आणि व्यावसायिक साहित्यांच्या शहरांतर्गतविश्वासार्ह वाहतुकीची सतत गरज निर्माण होते.

## पोकारी स्वेटतर्फे 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' मोहीमेचा शुभारंभ

पुणे, महाराष्ट्र: आयन सप्लाय ड्रिंकसाठी जागतिक स्तरावर नावाजलेल्या 'पोकारी स्वेट' या कंपनीने पुण्यात 'हायड्रेशन फॉर सिटी हिरोज' या मोहिमेचा शुभारंभ केला आहे. ही मोहीम पुणे कॅम्पमधील साधू वासवानी रोडवरील 'डीसीपी ट्रॅफिक ऑफिस, पुणे - २' येथे पाणी आणि क्षार पुरवठा मोहिमच्या (हायड्रेशन ड्राईव्ह) माध्यमातून राबवण्यात येणार आहे. या उपक्रमात ४० हून अधिक वाहतूक पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. शहराला गतीमान ठेवण्यासाठी सध्याच्या कडक उन्हातही न थकता काम करणाऱ्या या पोलिसांच्या कष्टाची दखल घेणे आणि त्यांच्या शरीरातील पाण्याची पातळी टिकवण्यासाठी त्यांना सहकार्य करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.पुणे शहर हे आता कडक उन्हाळा आणि दुचाकींचे शहर म्हणून ओळखले जाते. यामुळे उष्णतेचा त्रास आणि निर्जलीकरणासारखी आव्हाने पुण्यात प्रकर्षाने जाणवतात. अनेक पुणेकर थेट उन्हात प्रवास करतात आणि वाहतूक पोलीस कर्मचारी अशा अतिशय विषम हवामानातही वाहनांच्या गर्दीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी चोख पार पाडत असतात. त्यामुळे या मोहिमेची सुरुवात करण्यासाठी पुणे हे एका अर्थाने योग्य शहर ठरले आहे.

## 'भागूबाई'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

मुंबई: मराठी चित्रपटसृष्टीतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री निर्मिती सावंत पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. 'भागूबाई' या चित्रपटात त्या मुख्य भूमिकेत दिसणार असून आज या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ग्रामीण महाराष्ट्राच्या रंगतदार पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट २४ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत 'भागूबाई' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये 'भागूबाई' या खट्याळ, बिनधास्त आणि गप्पिष्ट बाईची मजेशीर दुनिया पाहायला मिळते. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये नाक खुपसत ती गावात गोंधळ माजवते आणि साध्या घटनांना मोठं रूप देत नात्यांमध्ये गैरसमज निर्माण करते. पण या सगळ्या विनोदामागे एक गंभीर सत्य दडलेलं असल्याची झलकही ट्रेलरमध्ये दिसते.

## तृप्ती डिमरी व्हिक्टोरिया सीक्रेट इंडिया'ची ब्रँड ॲम्बेसेडर

पुणे :अपॅरल ग्रुप, एक अग्रगण्य जागतिक फॅशन आणि जीवनशैली रिटेल समूहने तृप्ती डिमरीची व्हिक्टोरिया सीक्रेट इंडियाची पहिली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करून एका महत्त्वपूर्ण नव्या अध्यायाची घोषणा करत आहे.आज, व्हिक्टोरिया सीक्रेट आणि पिंक या बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रँड्सचा समावेश असलेल्या आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी, आनंद निर्माण करण्यासाठी व आकर्षकतेचा उत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्हिक्टोरिया सीक्रेटने, भारतात त्यांच्या 'समर सिग्रेचर' मोहिमेच्या शुभारंभाची घोषणा केली. या मोहिमेत प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री आणि नवीन स्थानिक ब्रँड ॲम्बेसेडर, तृप्ती डिमरी प्रमुख भूमिकेत आहे. 'समर सिग्रेचर' कलेक्शनमध्ये आरामदायक आणि परिधान करण्यास सोपी अंतर्वस्त्रे (लॉन्जरी) आणि स्लीपवेअरचा समावेश आहे, .

## काबुनी कडून शेन वॉटसन 'सुपर कोच' म्हणून नियुक्त

मुंबई : क्रिकेट प्रशिक्षणाची व्याख्या बदलणाऱ्या एआय आधारित 'काबुनी' या स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मने आज ऑस्ट्रेलियाचा माजी अष्टपैलू खेळाडू शेन वॉटसन याची 'सुपर कोच' म्हणून नियुक्ती केल्याचे जाहीर केले. जगभरातील सर्व स्तरांतील खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण सहज उपलब्ध करून देण्याच्या मोहिमेसाठी टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. काबुनीचे प्रगत तंत्रज्ञान आणि शेन वॉटसनचा क्रिकेटमधील दांडगा अनुभव या दोघा घटकांना या भागीदारीने एकत्र आणले आहे आणि त्यामुळे उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी डेटावर आधारित अचूक माहिती आणि प्रत्यक्ष मैदानावरील अनुभव यांचा एक शक्तिशाली मिलाफ होणार आहे.

## कोन इंडियाच्या राईज धोरणाला गती

छत्रपती संभाजीनगर - कोन एलिव्हेटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे आपल्या नवीन सॅटेलाइट कार्यालयाच्या लाँचची घोषणा केली. या लाँचसह ग्राहकांच्या अधिक जवळ पोहोचण्याप्रती आणि कंपनीच्या जागतिक राईज धोरणानुसार वाढीला गती देण्याप्रती कटिबद्धता अधिक दृढ केली आहे.चिखलठाणा एमआयडीसी भागात मोक्याच्या ठिकाणी असलेले हे नवीन कार्यालय कोन इंडियाची प्रादेशिक उपस्थिती अधिक दृढ करते आणि महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरी भागांना सेवा देण्याची त्यांची क्षमता वाढवते. १५ कर्मचाऱ्यांची टीम असलेले हे सॅटेलाइट कार्यालय छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड, परभणी, जालना, पैठण आणि वैजापूर यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमधील गरजा पूर्ण करेल.

## २५ एप्रिल शुक्रवारीला होणार शुभारंभ प्रयोग

छत्रपती संभाजीनगर – मराठी रंगभूमीवर एक वेगळा, भावनिक आणि मनाच्या आत खोलवर स्पर्श करणारा अनुभव घेऊन येणारे 'पुढच्या शुक्रवारी ७ वाजता' हे नवे नाटक येत्या २५ एप्रिल रोजी आपल्या पहिल्या प्रयोगासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जीवनातील नात्यांची गुंतागुंत, चढ-उतार आणि आशेचा नाजूक धागा यांची सांगड घालत हे नाटक प्रेक्षकांच्या आयुष्याशी जोडणारं एक भावविश्व निर्माण करणार आहे. आजच्या धकाधकीच्या आयुष्यात माणूस अनेकदा हरतो, खचतो, तुटतो... परंतु त्या सगळ्या अवस्थांमधून पुन्हा उभं राहाण्याची ताकद कुठून येते? नात्यांमध्ये अपेक्षा असाव्यात का, की निःस्वार्थ प्रेमच खरं असतं? हरवलेली मैत्री पुन्हा नव्याने सुरू होऊ शकते का? अशा अनेक प्रश्नांना भिडत हे नाटक प्रेक्षकांसमोर एक प्रामाणिक आणि वास्तववादी कथा मांडणार आहे. त्यामुळे हे नाटक मनोरंजनासोबतच, प्रत्येकाला स्वतःच्या आयुष्याचा आरसा दाखवणारा अनुभव ठरणार आहे.

## सयंतानी घोषने केले 'जगद्धात्री'चे कौतुक

छत्रपती संभाजीनगर -जगद्धात्री मालिकेतील अलीकडील भागांनी कथानक अधिक उत्कंठावर्धक बनवले आहे. रुद्रकडून झालेल्या गोळीबारामागचे सत्य जगद्धात्रीला ठाऊक असले तरी पुराव्याअभावी ती अडचणीत सापडते. माया मात्र कुटुंबाच्या बाजूने ठाम उभी राहत भावाचे संरक्षण करते. अभिनेत्री सयंतानी घोषने मायाच्या भूमिकेबद्दल बोलताना तिच्या व्यक्तिरेखेतील भावनिक गुंतागुंत आणि ताकदीचे कौतुक केले आहे. पुढील भागांमध्ये जगद्धात्री पुरावे मिळवण्याचा

# नूतन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कार्यभार स्वीकारला



छत्रपती संभाजीनगर, दि. 17(विमाका) : छत्रपती संभाजीनगर विभागाचे नूतन विभागीय आयुक्त म्हणून जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून आज पदभार स्वीकारला. श्री. पापळकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त प्रताप काळे, अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त दादासाहेब वानखेडे, अपर आयुक्त सुषमा देसाई, अपर आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त राजेश काटकर, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, सहआयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त सविता हरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविसकर, उपमहानगर नियोजनकार रवींद्र जायभाये, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे, उप मुख्य लेखाधिकारी साधना बांगर यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. श्रीकांत यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत मराठवाड्यातील शेती, टंचाईस्थिती तसेच सामाजिक विषय व प्रशासकीय विषयाबाबत माहिती जाणून घेतली. सर्वांनी समन्वयाने काम करून विकास साधूया, असे आवाहन त्यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर विभाग हा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विभाग असून, पर्यटन विकासाला चालना देतानाच शिक्षण, आरोग्य, महत्वपूर्ण उपक्रम व रोजगाराभिमुखतेवर भर देण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच विभागाला सर्वांगिण विकासाच्या दिशेने नेऊन राज्यात अग्रस्थानी आणण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासोबतच कामकाजात तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून ई-ऑफिस प्रणालीचा 100 टक्के अवलंब करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासकीय कामकाजात अंतर्गत समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

श्री. श्रीकांत हे 2009 च्या यूपीएससी बॅचचे अधिकारी असून त्यांनी परभणी येथे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण केला. त्यानंतर किनवट येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून प्रथम नियुक्ती झाली. नांदेड-वाघाळा महानगरपालिका आयुक्त, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला व लातूर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटी सहआयुक्त तसेच महानगरपालिका आयुक्त या पदांवर त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.

# खुलताबादेतील अवैध कत्तलखाना बुलडोझर ने केला जमीनदोस्त

तभा वृत्तसेवा



खुलताबाद दि १७ एप्रिल खुलताबाद शहरातील बनीबेगम बाग परिसरात सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यावर पोलिसांनी मोठी कारवाई करत जेसीबीच्या सहाय्याने उभारण्यात आलेले दोन शेड पूर्णपणे जमीनदोस्त केले. या धडक कारवाईमुळे खुलताबाद शहरांमध्ये खळबळ उडाली आहे .

दि १३ एप्रिल रोजी याच परिसरात सुरू असलेल्या कत्तलखान्यावर कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री यांनी धाड टाकून कत्तलीसाठी आणलेली जनावरे जप्त केली होती. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या वेळी गायी, गोऱ्हे आदी जनावरे जप्त करण्यात आली होती. या कत्तलखान्याबाबत संपूर्ण माहिती घेऊन गुरुवारी दुपारी पाच च्या सुमारास प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवत कत्तलखान्याचे पूर्णपणे जमीनदोस्त केला आहे.

या वेळी पोलीस उपअधीक्षक अपराजिता अग्निहोत्री. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, मुख्याधिकारी समीर शेख, सह कर्मचारी उपस्थित होते.

# कर्तृत्वाची नवी झेप : राजेश कांबळे यांना पदोन्नती

तभा वृत्तसेवा



**पैठण दि १७ |** प्रशासकीय कामात सातत्य, जबाबदारी आणि संवेदनशीलतेचा उत्कृष्ट संगम साधणारे राजेश कांबळे यांना पदोन्नतीचा बहुमान मिळाला आहे. पैठण येथील पंचायत समिती कार्यालयातील कार्यरत असलेल्या राजेश कांबळे यांची सहाय्यक प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती झाली असून त्यांनी नुकताच आपल्या नव्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.या प्रसंगी विनोद पाटील बोंबले यांच्याहास्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पंचायत समिती सदस्य,कर्मचारी अधिकारी यांची उपस्थिती होती.

सध्या त्यांच्याकडे सहाय्यक प्रशासन अधिकारी पदासोबतच सहाय्यक गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभारही सोपविण्यात आला आहे, ही त्यांच्या कामकाजावरील विश्वासाची पावती मानली जात आहे.

राजेश कांबळे यांचा प्रशासनातील प्रवास हा केवळ पदांपुरता मर्यादित नसून जनतेच्या प्रश्नांशी निगडित राहणारा आहे. यापूर्वी त्यांनी सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून काम करताना तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाईच्या तीव्र काळात उल्लेखनीय कामगिरी बजावली होती. अडचणीच्या परिस्थितीतही त्यांनी नियोजनबद्ध उपाययोजना राबवत नागरिकांना मोठा दिलासा दिला होता.

त्यांच्या या कामाची दखल घेतच त्यांना ही पदोन्नती देण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या या यशाबद्दल पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला असून सहकारी आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कर्तव्यनिष्ठा, जनहिताची जाणीव आणि कामातील प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर राजेश कांबळे यांनी प्रशासनात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून त्यांची ही पदोन्नती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पैठणला अस्मितेसाठी विराट हिंदू संमेलन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- लव जिहाद आणि जबरदस्तीने धर्मांतर विरोधात हिंदू अस्मितेसाठी पैठणला सकल हिंदू समाजाच्या वतीने दिनांक २० एप्रिल सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील राजपूत भवन येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून सदरील संमेलनात हिंदू बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन हिंदू संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे यावेळी महिलांना केसरी साडी तर पुरुषांना पांढरा कुर्ता असा ड्रेस कोड राहणार आहे.

या संमेलनाचे मुख्य उद्देश जागरण सक्रिय टीम निर्माण करणे, सज्जन शक्तीचा परस्पर समन्वय, सक्रिय हिंदू घडवणे, समाजाच्या प्रश्ना बाबत जागरुकता, हिंदू नेतृत्व निर्माण करणे हे राहणार आहे.लव जिहाद, जबरदस्तीने धर्मांतर, हिंदू बांधवांवर अत्याचार अशा अनेक घटनेने राज्यात धुमाकूळ घातला असतांना त्याला पैठण ही अपवाद ठरले आहे. कम्प्युटर क्लासेस चालवणाऱ्या एका नराधमाने हिंदू मुलीचे अपहरण करून लैंगिक शोषण करणे,तसेच पैठण बस स्थानकावर हिंदू मुलींचे आणि महिलांचे फोटो घेऊन त्यांना त्रास देणाऱ्या एका मुस्लिम युवकावर पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेच नाही तर असे सर्व प्रकार अतिशय नियोजन बद्ध पद्धतीने केले जात असून याचे पाणे मुळे खोलवर रोवली गेल्याचे आरोप होत आहेत. अशा परिस्थितीत हिंदू बांधवांनी आपल्या परिवारातील मुली व महिलांची काळजी घेण्याचे आता गरजेचे बनले आहे. हिंदू अस्मितेसाठी आणि समाज बांधवांच्या संरक्षणासाठी पैठणला विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाला समाज प्रबोधनकार अमृत महाराज जोशी,प्रांत कार्यकारी सदस्य डॉ. दिवाकर कुलकर्णी,श्रीकृष्ण महानुभाव आश्रमाचे सुदर्शन महाराज कपाटे,हिंदू योद्धा भारत आमदापुरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता संमेलन स्थळ राजपुत भवन येथे ध्वज पूजन होणार असून सोमवारी सायंकाळी ४ वाजता खंडोबा महाराज चौक ते संमेलन स्थळा पर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. 'धर्म रक्षती रक्षित' या युक्ती प्रमाणे तमाम हिंदू बांधवांनी तसेच भगिनींनी या संमेलनात लाखोंच्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन हिंदू संमेलन समिती पैठणच्या वतीने करण्यात आले आहे.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरचा "शिका आणि कमवा" उपक्रम; जिल्हानिहाय प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.16 : कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर मार्फत तरूणांसाठी रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रा.लि. यांच्या "शिका आणि कमवा" (Learn & Earn) या उपक्रमांतर्गत 23 ते 30 एप्रिल, 2026 कालावधीत विविध जिल्ह्यांमध्ये प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे इच्छुक उमेदवारांना 23 एप्रिल, 2026 रोजी बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट, जि.नांदेड, 24 एप्रिल, 2026 रोजी पंडित गुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा, ता.परळी, जि.बीड, 27 एप्रिल, 2026 रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धर्माबाद, जि.नांदेड, 28 एप्रिल, 2026 रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हिंगोली, 29 एप्रिल, 2026 रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव, रसिका महाविद्यालय, देवणी, महात्मा फुले महाविद्यालय, जळकोट, जि.लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे.

या उपक्रमांतर्गत निवड होण्यासाठी उमेदवाराचे वय 18 ते 29 वर्षे असावे तर शैक्षणिक पात्रतेत उमेदवार 10 वी, 12वी, आयटीआय उत्तीर्ण असावा. तांत्रिक क्षेत्रात करिअर करण्याची इच्छाशक्ती उमेदवारांमध्ये असावी. निवड झालेल्या उमेदवारांना टायोटा किर्लोस्कर मोटर, बेंगळूरू येथे अत्याधुनिक तांत्रिक प्रशिक्षण दिले जाईल.

तरी जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये संबंधित ठिकाणी दिलेल्या दिनांकास उपस्थित राहून आपल्या करिअरला नवी दिशा द्यावी व या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या उपआयुक्ता विद्या शितोळे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

# फर्दापूर कांदा बियाणे काढण्यासाठी शेतकरी यांची लगभग



तभा वृत्तसेवा

**फर्दापूर दि 16 |** फर्दापूर परिसरात कांदा बियाणे काढण्यासाठी शेतकरी करीत आहेत घाई सध्या परिसरात पाऊस सांगितले असल्याने कांदा बियाणे ठेवण्यात आलेला कांदा बियाणे शेतकरी छोट्या मशीन ने काढण्यासाठी घाई करत आहेत कारण की पावसाने या कांदा बियाणे चे नुकसान मोठ्या प्रमाणात होतें यामुळे शेतकरी घाई करत असुन कुटुंबातील सर्व लहान मुले सुद्धा कामासाठी मदत करण्यात व्यस्त आहेत.

## सीबीएसई बोर्ड दहावी परीक्षेमध्ये निरज पाटील जैन इंटरनॅशनल स्कूल मध्ये प्रथम

तभा.वृत्तसेवा



**सोयगाव,दि.१७ एप्रिल |** सीबीएसई बोर्ड दहावी परीक्षेमध्ये सोयगाव येथील निरज किरणकुमार पाटील जैन इंटरनॅशनल स्कूल जामनेर मध्ये प्रथम सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षे मध्ये मिळवून सोयगाव येथील मिरज किरणकुमार पाटील हा विद्यार्थी ९६.२० % मिळवून गुण जामनेर येथील जैन इंटरनॅशनल स्कूल प्रथम आलेला असून निरजच्या या यशा मागे त्याची मेहनत जिद्द चिकाटी तसेच शाळेतील शिक्षक याचे मोलाचे मार्गदर्शन असल्याचे निरजच्या पालकांनी सांगितले तसेच निरजच्या यशप्राप्ती बद्दल महाराष्ट्र राज्याचे मंत्री गिरीष महाजन,जामनेर शहराच्या नगराध्यक्षा साधनाताई महाजन जामनेर,शहराचे माजी उपनगराध्यक्ष प्रा.शरद पाटील तसेच जिल्हा परिषद सदस्या छत्रपती संभाजीनगर पुष्पाताई काळे,सोयगाव केंद्राचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी,प्रा.अनिल मानकर याच्यासह सोयगाव येथील शिक्षक वर्गाने अभिनंदन केले.

# अग्रसेन विद्या मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांचे विक्रमी यश

इटखेडा / प्रतिनिधी - २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील सी.बी. एस.ई. बोर्ड निकाल जाहीर झाले असून ईटखेडा येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी विक्रमी यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. शाळेचे एकूण १९९ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले होते. सर्वोत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. ज्यांनी कठोर परिश्रम, समर्पण आणि चिकाटीने संस्थेचे नाव उंचावले. शाळेतून सर्वप्रथम येण्याचा मान रिधीमा पवार (९८%) हिने मिळविला, ध्रुव मेहेत्रे व आर्या भालेराव यांनी (९७.६%) मिळवून द्वितीय तर अक्षरा रोहातिया व वेदांत पिंगे यांनी (९७.२%) गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. वरुण ठक्कर, शौर्य कुलवाल (९६.८%), अभिजीत देशमुख, साक्षत काळे (९६.६%), खुशी आंबेकर (९६.४%) यांनी घवघवीत यश मिळविले.

एकूणच नेत्रदिपक यश मिळविणाऱ्या आणि प्रथम श्रेणीचे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६४ अशी लक्षणीय आहे. रिधीमा पवार हिने (इंग्रजी), आर्या भालेराव, रिद्धी पाटील, ऋतूराज तुपे, साक्षत काळे, संस्कृती जगताप, शौर्य कुलवाल, स्वराली मुळे (संस्कृत), खुशी आंबेकर, क्रांती पवार, अर्जुन सुर्यवंशी, आरोही धिमधिमे, वेदश्री हाके (मराठी), ध्रुव मेहेत्रे व वेदांत पिंगे (सामाजिक शास्त्र) या विषयात १०० गुण मिळवले.

शाळेतील सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे शाळा समितीचे अध्यक्ष सच्चानंदजी अग्रवाल, उपाध्यक्ष गोकुळजी अग्रवाल, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे प्राचार्य संतोष कुमार कारवा, उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधिक्षक अजय सोनुने, विभाग प्रमुख सुचिता मुंदडा आणि सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य " या विषयावर विद्यार्थी, नागरिकानी स्पर्धेत ऑनलाईन सहभाग नोंदवावा

**छत्रपती संभाजीनगर दि,१५ |** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET) यांच्या वतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे."भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य" या विषयावर निबंध सादरीकरण करावयाचे आहे. निबंध PDF स्वरूपात https://forms.gle/RcFPhcUgY8X4P2NT8 या लिंकवर अपलोड करणे आवश्यक आहे. ही स्पर्धा १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे आणि महापुरुषांचे विचार तरुण पिढीमध्ये रुजवणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. स्पर्धकांना दिलेला निबंध ऑनलाइन लिंकद्वारे सादर करावा लागणार आहे.

स्पर्धा दोन गटांत विभागली असून, दोन्ही गटांसाठी शब्दमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. गट १ (विद्यार्थी गट) आयटीआय (ITI), डिप्लोमा, बायफोकल आणि MCVC चे विद्यार्थी. ५०० ते ८०० शब्द. गट २ (खुला गट) राज्यातील सर्व पुरुष व महिला नागरिक यांच्यासाठी शब्दमर्यादा ८०० ते १२०० शब्द आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आणि विचारांवर प्रकाश टाकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शासनाने दिलेल्या अधिकृत लिंकचा वापर करावा. अधिक माहितीसाठी स्थानिक जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. स्पर्धेतील विजेते यांना प्रथम पारितोषिक ३१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह , सन्मानपत्र द्वितीय २१हजार रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र तर तृतीय पारितोषिक ११, हजार रुपये ,स्मृतिचिन्ह , सन्मानपत्र असे असणार आहे. निबंध मराठी भाषेत लिहिणे अनिवार्य आहे.निबंध मूळ (Original) असावा, कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर योग्य आणि सुसंस्कृत असावा. निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपात स्वीकारला जाईल.मात्र अंतिम सादरीकरण PDF स्वरूपातच करणे आवश्यक आहे. निबंध टाईप करून किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करून दिलेल्या लिंकवर अपलोड करावा.